नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६८ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. २३ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# भौतिकशास्त्राचा पेपर फोडणाऱ्या शिक्षिकेला बेड्या

## नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयची पुण्यात मोठी कारवाई

**मुंबई : (स. गांवकरी)**

देशात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात दोन शिक्षकांना अटक केल्यानंतर आता केंद्रीय अन्वेषण विभागाने पुण्यातील आणखी एका शिक्षिकेला अटक केली आहे. मनीषा संजय हवालदार असे या शिक्षिकेचे नाव असून, या महिलेचा नीट परीक्षेचा भौतिकशास्त्राचा पेपर फोडण्यात कथित सहभाग होता, अशी माहिती सीबीआय अधिकाऱ्यांच्या हवाल्याने इंडियन एक्सप्रेसने प्रसिद्ध केली आहे. यापूर्वी सीबीआयने नॅशनल टेस्टिंग एजन्सीने नियुक्त केलेल्या दोन शिक्षकांना अटक केली आहे. "संशयित आरोपी मनीषा संजय हवालदार सध्या पुण्यातील सेठ हिरालाल सराफ प्रशालेत कार्यरत असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने त्यांना नीट परीक्षेसाठी तज्ञ म्हणून नियुक्त केले होते. हवालदारांकडे




नीट भौतिकशास्त्राच्या प्रश्नपत्रिका उपलब्ध होत्या. एप्रिलमध्ये भौतिकशास्त्राचे अनेक प्रश्न सहआरोपी मनीषा मांढरेला शेअर केले होते. पेपरफुटीच्या या प्रकरणात मांढरेला १६ मे रोजी अटक करण्यात आली आहे," एक्सप्रेने सीबीआयच्या हवाल्याने प्रसिद्ध केलेल्या वृत्तात म्हटले आहे. संशयित मनीषा हवालदारने शेअर केलेले प्रश्न नीट भौतिकशास्त्राच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांशी जुळल्याचे सीबीआयच्या तपासात उघड झाले आहे. गेल्या आठवड्यात मनीषा मांढरे यांना या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. मांढरे पुण्यातील शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात शिक्षिका म्हणून सन २००२ पासून महाविद्यालयात कार्यरत आहेत. गेली २४ वर्षे अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना जीवशास्त्र विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांचा अध्यापनातील अनुभव लक्षात घेऊन नॅशनल टेस्टिंग एजन्सीने नीट परीक्षेसंदर्भातील काही गोपनीय कामकाजासाठी त्यांची नियुक्ती केली होती.

या प्रकरणात काही दिवसांपूर्वी सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना लातूर येथून अटक केली आहे. लातूरमधील दयानंद ज्युनियर कॉलेजचे रसायनशास्त्राचे ते निवृत्त प्राध्यापक आहेत. कुलकर्णी अनेक वर्षे नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या परीक्षा प्रक्रियेशी संलग्न होते. दरम्यान "नीट पेपरफुटीप्रकरणी देशभरातील विविध ठिकाणी केलेल्या शोधमोहिमेत अनेक कागदपत्रं, लॅपटॉप, बँक स्टेटमेंट आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. जप्त केलेल्या वस्तूंचे फॉरेन्सिक-डिजिटल विश्लेषण केले जात आहे," असे सीबीआयने एक्सप्रेसशी बोलताना सांगितले.

### आतापर्यंत ११ संशयितांना अटक

दरम्यान, देशभर गाजत असलेल्या नीट पेपरफुटीच्या प्रकरणात आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि आहिल्यानगरसह विविध शहरांमधून एकूण ११ संशयितांना अटक करण्यात आली आहे, असे सीबीआयने सांगितले.

## अहिल्यानगरमधील सरकारी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा 'नो व्हेईकल डे'



**अहिल्यानगर : (स. गांवकरी)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत व पर्यावरण संरक्षणाच्या आवाहनाला तसेच राज्य शासनाच्या हरित उपक्रमांना प्रतिसाद देत अहिल्यानगर जिल्ह्यात आज, शुक्रवारी सरकारी कार्यालयांतून 'नो व्हेईकल डे' उपक्रम राबविण्यात आला. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयासह अनेक शासकीय कार्यालयांच्या आवारातून वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या कमी आढळली. अनेक अधिकारी व कर्मचारी सायकल, वीजेवरील वाहन, सार्वजनिक वाहतुकीचा वापर करत तसेच पायी चालत कार्यालयात पोहोचले. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हाधिकाऱ्यांचे यांचे स्वीय सहायक सुरेश आघाव सायकलवरून कार्यालयात पोहोचले. उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, गौरी सावंत, तहसीलदार शोभा पुजारी, तहसीलदार संचेती यांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून नंतर कार्यालयात पायी चालत येत उपक्रमात सहभाग नोंदविला. मात्र कामानिमित्त सरकारी कार्यालयातून येणारे नागरिक बहुसंख्यपणे वैयक्तिक वाहनांचा वापर करूनच आलेले होते.

## थोडक्यात...

### सिबिलचे तोंडी आदेश बँकांकडून फाट्यावर

मुंबई (स. गांवकरी) : राज्यस्तरीय बँकिंग समितीच्या बैठकीत गत पाच वर्षांपासून सीबिलचा विषय उपस्थित होतो. मुख्यमंत्री कृषी कर्ज देताना शेतकऱ्यांकडून सीबिल मागू नका, असे आदेश देतात. रिझर्व बँकेला ही तशी सूचना करतात. पण, रिझर्व बँक शेतकऱ्यांकडून सिबिल मागू नये किंवा शेती कर्ज देताना सिबिलची अट रद्द केली आहे, अशा आशयाचे परिपत्रक काढत नाही, फक्त तोंडी सूचना दिल्या जातात. या तोंडी सूचनेचा प्रत्येक बँक आपल्या सोयीनुसार अर्थ लावून सीबिलची मागणी करतात. त्यामुळेच राज्यातील कृषी कर्ज खातेदारांची संख्या घटली आहे. कर्ज नाकारल्यामुळे शेतकरी कर्जासाठी सावकाराच्या दारात जात असल्याचे चित्र समोर आले आहे. राज्यस्तरीय बँकिंग कमिटीची गुरुवारी सह्याद्री अतिथी गृहात बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी गतवर्षीप्रमाणेच यंदाही शेतकऱ्यांकडून सिबिल मागू नये. सिबिल मागितल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा दिला. प्रत्यक्षात सिबिल बाबत अशा प्रकारचा इशारा गत पाच – सहा वर्षांपासून दिला जात आहे. पण या इशाऱ्याचा बँकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. ग्रामीण भागात बँकांकडून शेतकऱ्यांकडे सिबिलची मागणी केली जाते आणि सिबिल नसेल किंवा सिबिल खराब असेल तर बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत. नाईलाजाने हे शेतकरी खासगी सावकाराच्या दारात उभा राहतात. त्यामुळेच राज्यात कर्जदार शेतकऱ्यांच्या संख्येत गत चार वर्षात १७ लाख लाखांनी घट झाली आहे. मराठवाडा आणि विदर्भात खासगी सावकारांची संख्या मोठी आहे.

### राज्यात निम्मी वाहने 'एचएसआरपी'विना

पुणे (स. गांवकरी) : गेल्या वर्षभरात पाच वेळा मुदतवाढ देऊनही राज्यातील निम्म्या वाहनांना अद्याप उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविली गेलेली नाही. परिवहन विभागावर त्यामुळे आणखी एक मुदतवाढ देण्याची वेळ आली असून, आता 'एचएसआरपी' लावण्यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम मुदत असेल.'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांवर येत्या १ जुलैपासून प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायुवेग पथकाद्वारे कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांचे हस्तांतर, कर्जबोजा चढविणे-उतरविणे इत्यादींवर निर्बंध लागू होतील. 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे, परवाना नूतनीकरण इत्यादी कामे यापुढे थांबविण्यात येणार आहेत.

## रत्नागिरीत तरुणाची कोयत्याने हत्या; तीन संशयित ताब्यात

**रत्नागिरी : (स. गांवकरी)**

रत्नागिरी शहराजवळील कुवारबाव परिसरात गुरुवारी रात्री घडलेल्या एका थरारक घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. साईनगर येथील सात बंगल्याच्या मागील भागात एका २५ वर्षीय तरुणावर कोयत्याने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. सूरज राजाराम झोरे (वय २५, मूळ रा. नायरी, ता. संगमेश्वर; सध्या रा. विरार, मुंबई) असे मृत तरुणाचे नाव असून, या प्रकरणी शहर पोलिसांनी तिघा संशयितांना ताब्यात घेतले आहे. शुक्रवारी दुपारी उपचारादरम्यान सूरजचा मृत्यू झाला. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सूरज झोरे हा काही कामानिमित्त रत्नागिरी येथे आला होता. गुरुवारी रात्री सुमारे ९.३० ते १०.५३ वाजण्याच्या दरम्यान साईनगर येथील सात बंगल्याच्या मागील भागात त्याच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात सोहम एकनाथ म्हात्रे, अभिषेक देवानंद राठोड आणि नजीबूल शेख उर्फ सोनू या तिघांनी मिळून सूरजवर




कोयत्याने सपासप वार केल्याचा आरोप आहे. विशेषतः सुरज याच्या मानेवर आणि हातांवर गंभीर वार करण्यात आल्याने सूरज गंभीर जखमी झाला होता. हल्ल्यानंतर परिसरातील नागरिकांनी आणि काही स्थानिकांनी तातडीने सूरजला रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, या झालेल्या हल्ल्या नंतर त्याची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने त्याला अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. सुरज याला वाचविण्यासाठी जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांकडून शर्थीचे प्रयत्न करण्यात आले, मात्र उपचार सुरू असतानाच शुक्रवारी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुवारबाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मतदार यादीतील नावे वगळल्यावर दुरूस्तीसाठी सहा दिवसांची मुदत

### राजकीय पक्षांनाही याद्या देणार, वाद टाळण्यासाठी निवडणूक आयोगाची भूमिका

**मुंबई : (स. गांवकरी)**

महाराष्ट्रात होत असलेल्या मतदारयांद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीत (एसआयआर) पारदर्शकता आणण्याकरिता वगळल्या गेलेल्या मतदारांच्या याद्या राजकीय पक्षांनाही देण्यात येतील. तसेच त्या अंतिम करण्यापूर्वी संकेतस्थळावर जाहीर केल्या जाणार असून, वगळल्या गेलेल्या मतदारांना पुरावे सादर करण्याकरिता सहा दिवसांची मुदत दिली जाईल, अशी ग्वाही राज्याचे निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांनी पत्रकार परिषदेत दिली. देशभर राबविण्यात येणाऱ्या एसआयआरच्या तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील ९ कोटी ८६ लाख मतदारांची फेरतपासणी केली जाणार आहे. जनगणनेअंर्तगत सुरू असलेली घरगणना मोहीम संपल्यानंतर ३० जूनपासून घरोघरी मतदार गणनेच्या अर्जांचे वाटप करत ही प्रक्रिया सुरू केली जाईल. आतापर्यंत राज्यातील ७२ टक्के मतदारांचीच प्राथमिक तपासणी (मॅपिंग) पूर्ण झाली आहे. थोडक्यात या मतदारांना नागरिकत्त्वाचे कुठलेही पुरावे



सादर करण्याची गरज नाही. परंतु, उर्वरित २८ टक्के मतदारांच्या फेरतपासणीसोबतच राज्यातील स्थलांतरितांची, नवीन मतदारांची नावे समाविष्ट करण्याचे मोठे आव्हान निवडणुक आयोगासमोर आहे.

मतदारयाद्यांच्या सखोल विशेष फेरतपासणी मोहिम ही ही मतदारांची नावे वगळण्याकरिता नसून त्या सुधारणा करण्याकरिता आहे, . मृत्यू, स्थलांतर, गैरहजेरी आणि दुबार नावे वगळून मतदार यादी अधिक सुस्पष्ट करण्याकरिता एसआरए राबविली जात आहे. ही प्रक्रिया पारदर्शक करण्याकरिता वगळलेल्या मतदारांच्या नावांची यादी संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल. त्याबरोबरच आम्ही अधिकची खबरदारी घेत आहोत. वगळल्या जाणाऱ्या नावांची यादी बूथ लेव्हल एजंट्सना (बीएलए) उपलब्ध करून दिली जाईल. त्यावर संबंधित मतदारांचे आक्षेप असल्यास त्यांना कागदपत्रे सादर करण्याकरिता सहा दिवसांचा कालावधी देऊ, असे चोकलिंगम यांनी सांगितले.

पडताळणीदरम्यान घरे बंद आढळल्यास कर्मचारी किमान तीन भेटी देतील. ज्या प्रकरणांमध्ये मतदारांची नावे मागील नोंदींशी जुळत नाहीत, अशा प्रकरणांसाठी निवडणूक आयोगाने पुराव्यादाखल ११ कागदपत्रे ठरवून दिली आहेत. त्यापैकी कोणतेही एक कागदपत्र मतदार सादर करू शकतात. यात आधारचा समावेश नाही. आधार केवळ ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारला जाईल, नागरिकत्वाचा पुरावा म्हणून नाही, असे चोकलिंगम यांनी स्पष्ट केले. ज्या ७२ टक्के मतदारांची प्राथमिक तपासणी (मॅपिंग) झाली आहे, त्यांना सध्याचा तपशील असलेले, आधीच भरलेले गणना अर्ज मिळतील. या सोबतच २००२ ते २००४ दरम्यान झालेल्या शेवटच्या एसआयआरमधील नोंदींचे मॅपिंगही असेल. मतदार नाव, जिल्हा आणि विधानसभा मतदारसंघ यांसारख्या मूलभूत माहितीचा वापर करून निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळाद्वारे स्वतंत्रपणे आपल्या तपशिलाची पडताळणी देखील करू शकतात.

# शिक्षण व्यवस्थेच्या नावाखाली भविष्याचा सौदा?

- कोचिंग साम्राज्य, परीक्षा गैरप्रकार आणि पालकांच्या विश्वासाला बसलेला तडा; राज्यभर संतापाची भावना!
- पालकांच्या कष्टावर कोट्यवधींचे साम्राज्य? शिक्षण क्षेत्रातील गैरप्रकारांवर संताप!
- विद्यार्थ्यांच्या स्वप्नांशी खेळ थांबणार कधी? शिक्षण व्यवस्थेवर गंभीर सवाल!
- कोचिंग संस्कृती की शिक्षणाचा बाजार? व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्न?
- NEET च्या नावाखाली भविष्याचा सौदा? विद्यार्थी-पालकांमध्ये संताप!
- NEET परीक्षेभोवती वाढते प्रश्नचिन्ह; शिक्षण व्यवस्थेवर गंभीर सवाल!
- NEET च्या नावावर लाखोंची फी, विद्यार्थ्यांच्या मेहनतीला न्याय मिळणार?



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

**(स. गांवकरी)**

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राबाबत पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांना यशाचे स्वप्न दाखवणाऱ्या, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे आश्वासन देणाऱ्या आणि मोठमोठ्या निकालांच्या जाहिराती करणाऱ्या शिक्षण संस्था व कोचिंग व्यवस्थांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता,




प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी यावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राज्यातील लाखो विद्यार्थी, पालक आणि सामान्य नागरिकांच्या मनात अस्वस्थता निर्माण झाली असून "शिक्षण हा ज्ञानाचा मार्ग राहिला की बाजारपेठ झाली?" असा प्रश्न अनेकांकडून विचारला जात आहे.

गावाकडचा शेतकरी बाप, मजुरी करणारा कष्टकरी, हातावर पोट भरणारे सामान्य कुटुंब आणि मध्यमवर्गीय पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आयुष्यभर संघर्ष करत असतात. स्वतःच्या इच्छा-आकांक्षा बाजूला ठेवून मुलांनी शिकावे, मोठे व्हावे, घराची परिस्थिती बदलावी, समाजात नाव कमवावे या आशेने आई-वडील अहोरात्र कष्ट घेत असतात. कुणी जमीन गहाण ठेवतो, कुणी कर्ज काढतो, तर कुणी घरातील सोनं गहाण ठेवून मुलांच्या शिक्षणासाठी पैसा उभा करतो. कारण शिक्षण हेच आयुष्य बदलण्याचे सर्वात मोठे साधन असल्याचा विश्वास आजही समाजात आहे.

मात्र गेल्या काही वर्षांत शिक्षण क्षेत्रात वाढलेल्या व्यावसायिक स्पर्धेमुळे आणि कोचिंग संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळे परिस्थिती वेगळ्या दिशेने जात असल्याची चिंता व्यक्त होत आहे. एकेकाळी गुणवत्ता, मेहनत आणि ज्ञानाच्या आधारावर उभ्या राहिलेल्या शिक्षण व्यवस्थेत आता मोठ्या जाहिराती, निकालांचे मार्केटिंग, स्पर्धात्मक व्यावसायिक मॉडेल आणि यश विकण्याची प्रवृत्ती वाढल्याची चर्चा समाजात सुरू आहे. विशेषतः वैद्यकीय, अभियांत्रिकी, स्पर्धा परीक्षा आणि उच्च शिक्षणासाठीच्या तयारीमध्ये कोचिंग उद्योगाचे जाळे मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. पालक आपल्या मुलांच्या भविष्यासाठी लाखो रुपयांची फी भरत आहेत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या क्षमतेपेक्षा आर्थिक क्षमता अधिक महत्त्वाची होत असल्याची टीकाही व्यक्त होत आहे.

अनेक ग्रामीण भागातील विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतात. एखादा विद्यार्थी दिवसभर शेतीत काम करून रात्री अभ्यास करतो. कुणी वसतिगृहात साध्या परिस्थितीत राहतो. कुणी मित्रांसोबत एकाच खोलीत राहून स्पर्धा परीक्षांची तयारी करतो. अनेक विद्यार्थी आर्थिक अडचणींवर मात करत स्वप्न पूर्ण करण्यासाठी झगडत असतात.

एका शेतकरी बापाची कल्पना करा. उन्हाळ्यात अंगाची लाही-लाही होत असताना तो शेतात राबतो. पावसाळ्यात चिखलात उतरतो. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला असतानाही मुलांच्या फीची काळजी करतो. मुलाने डॉक्टर व्हावे, अधिकारी व्हावे, घर बदलावे, दारिद्र्य संपवावे या आशेने तो प्रत्येक दिवस लढत असतो. मात्र जर परीक्षा प्रक्रियेवरच प्रश्न निर्माण होत असतील, परीक्षा रद्द होत असतील, पेपरफुटीच्या चर्चा समोर येत असतील किंवा विद्यार्थ्यांच्या मेहनतीपेक्षा दुसरे मार्ग प्रभावी ठरत असल्याची भावना निर्माण होत असेल, तर सर्वात मोठा धक्का बसतो तो प्रामाणिक विद्यार्थ्यांना.

एक विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतो. मित्रांच्या वाढदिवसांना जात नाही. मोबाईल, मनोरंजन, आराम यापासून दूर राहतो. घरापासून लांब राहून दिवस-रात्र अभ्यास करतो. कारण त्याला विश्वास असतो — मेहनतीचे फळ मिळेल.

परंतु जर व्यवस्थेतील त्रुटींमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होत असेल, तर ती केवळ प्रशासकीय चूक राहत नाही; ती समाजाच्या भविष्यासमोरील गंभीर समस्या बनते.

शिक्षक हा समाजाचा मार्गदर्शक मानला जातो. ज्ञान देणारा, संस्कार घडवणारा आणि विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवणारा घटक म्हणून शिक्षकाकडे पाहिले जाते. विद्यार्थी अनेकदा शिक्षकांवर डोळे झाकून विश्वास ठेवतात. पालक शिक्षकांच्या हातात आपल्या मुलांचे भविष्य देतात.

म्हणून शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची सामाजिक जबाबदारी अधिक मोठी असते. ज्ञानाचा उपयोग समाज घडवण्यासाठी व्हायला हवा; व्यवस्था कमकुवत करण्यासाठी नव्हे, असे मत अनेक सामाजिक कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया आणि प्रवेश व्यवस्थांबाबत वारंवार प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अभ्यास करूनही न्याय मिळेल का, ही चिंता अनेक विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होत आहे.

याच पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रातील पारदर्शकता, परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता आणि संस्थात्मक जबाबदारी अधिक मजबूत करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

शिक्षण क्षेत्राशी संबंधित गैरप्रकारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, दोषींना शिक्षा झाली पाहिजे, तपास निष्पक्ष झाला पाहिजे आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड करणाऱ्यांवर कायद्याचा कठोर बडगा उगारला गेला पाहिजे, अशी मागणी समाजातून होत आहे.

राज्यातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य, पालकांच्या आयुष्यभराच्या कष्टांची कमाई आणि शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास टिकवण्यासाठी शासन, शिक्षण संस्था, परीक्षा यंत्रणा आणि समाज यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज निर्माण झाली आहे.

कारण शिक्षण हा केवळ उद्योग नाही, तो राष्ट्र घडवण्याचा पाया आहे. हा पाया मजबूत असेल तर समाज मजबूत राहील; पण जर शिक्षण व्यवस्थेवरचा विश्वास ढासळला, तर त्याचा परिणाम पुढच्या अनेक पिढ्यांवर होऊ शकतो.

आज गरज आहे ती केवळ कारवाईची नाही; तर शिक्षण व्यवस्थेच्या शुद्धीकरणाची, पारदर्शकतेची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीला न्याय देणाऱ्या मजबूत व्यवस्थेची. कारण प्रत्येक विद्यार्थ्याच्या डोळ्यात एक स्वप्न असतं आणि त्या स्वप्नाची किंमत कोणत्याही पैशापेक्षा मोठी असते.

## थोडक्यात पण महत्वाचे




### प्रल्हाद काकड यांचा राज्याध्यक्ष बाळासाहेब सोनवणेकडून सत्कार

नाशिक (स. गांवकरी) : नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीपदी प्रल्हाद काकड यांची निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष बाळासाहेब सोनवणे सर यांच्या शुभहस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मखमलाबाद येथील रहिवासी असलेले क्रांतिवीर व्ही.एन.नाईक शिक्षण संस्थेचे संचालक प्रल्हाद आप्पा काकड यांनी सामाजिक, सहकार, शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने केलेले कार्य, तसेच ग्रामीण भागाशी जपलेले आपुलकीचे नाते यामुळे त्यांची नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती बिनविरोध निवड झाली. यावेळी राज्य शासन आरोग्य विभागातील सेवानिवृत्त श्यामभाई बर्वे, मराठा समाज सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष संजयजी फडोळ, सामाजिक कार्यकर्ते शांतारामजी काकड आदी उपस्थित होते.उपस्थितांनी प्रल्हाद आप्पा काकड यांना पुढील यशस्वी कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

### जिल्ह्यात नऊ ठिकाणी असणार मतदान केंद्र

नाशिक (स. गांवकरी) : भारत निवडणूक आयोगाने 18 मे 2026 रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या नाशिक स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक 2026 ची घोषणा केली आहे. या दिवसापासून आदर्श आचारसंहिता संपूर्ण नाशिक जिल्ह्यात लागू झाली आहे. या निवडणुकीसाठी जिल्ह्यात नऊ मतदान केंद्रे असतील, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी आयुष प्रसाद यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत जिल्हाधिकारी प्रसाद बोलत होते. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मधुमती सरदेसाई उपस्थित होत्या. जिल्ह्यात आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. उल्लंघन होणार नाही याची सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

### अधिक मास निमित्त भव्य दिव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा



आळंदी (स. गांवकरी) : पुणे आळंदी रस्त्यावरील वडमुखवाडी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्ट चे वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यात श्री संत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा उत्साहात होणार आहे. पारायण सोहळ्याचे व्यासपीठ नेतृत्व ह. भ. प. आचार्य भगवानजी महाराज शास्त्री आळंदी करणार आहेत. पुरूषोत्तम मास म्हणजेच अधिक मास सुरू झालेला आहे. पुरुषोत्तम मास हा नाम चिंतन, श्रवण, भजन, कीर्तन या साठी पर्वणी आहे. भाविक, नागरिकांनी या सप्ताहात धार्मिक पर्वणीत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी. असे आवाहन श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान मंदिर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर यांनी केले. शनिवार २३ ते ३० मे २०२६ या दरम्यान श्री ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी पारायण सोहळा तसेच शनिवार ३० मे ते ६ जून २०२६ या कालावधीत धार्मिक पर्वणीचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष ॲड विष्णू तापकीर यांनी केले आहे.

### विशाल दळवी यांचा जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या हस्ते विशेष सन्मान



अहिल्यानगर (स. गांवकरी) : भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील खुनाच्या क्लिष्ट आणि आव्हानात्मक गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपींना अटक करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याबद्दल कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस हेड कॉन्स्टेबल विशाल अशोक दळवी यांना अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. गेल्या दि.२७ एप्रिल २०२६ रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाणे गु.र.नं. २२२/२०२६, बीएनएस कलम १०३(१), २३८ (३)(५) अंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास करताना मिसिंग व्यक्ती प्रसाद रोहिदास जाधव यांचा खून झाल्याचे उघडकीस आले. आरोपींनी वाकोडी शिवारातील उसाच्या शेतात लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यांचा खून करून मृतदेह टाकून दिला होता. या प्रकरणात गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत विशाल दळवी यांनी आरोपींचा शोध घेतला. आरोपी शुभम हरि भोसले (वय २०, रा. वाकोडीफाटा) आणि समाधान उर्फ बाळ्या रामदास सोनवणे (वय ४२, रा. बुरुडगाव) यांना अटक करून गुन्ह्याचा छडा लावण्यात आला.विशाल दळवी यांनी केलेली कामगिरी अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलासाठी अभिमानास्पद असल्याचे नमूद करत, भविष्यातही अशीच उल्लेखनीय कामगिरी करून पोलीस दलाची प्रतिमा उंचावावी, अशा शुभेच्छा प्रशस्तीपत्रातून देण्यात आल्या. हे प्रशस्तीपत्र अप्पर पोलीस अधीक्षक मा. वैभव कलुबर्मे तसेच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन (भा.पो.से.) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

### सामाजिक कार्यकर्ते भारत पवार यांचे संवेदनात्मक आवाहन

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर जिल्ह्यात नव्याने रुजू झालेले पोलीस अधीक्षक मा.मुम्माक्का सुदर्शन यांचे सामाजिक कार्यकर्ते भारत पवार यांनी मनःपूर्वक स्वागत करत एक अत्यंत संवेदनशील आणि समाजहिताचा मुद्दा मांडला आहे. सध्या जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. बेरोजगारी, आर्थिक अस्थिरता, सामाजिक तणाव आणि विशेषतः झटपट श्रीमंत होण्याची मानसिकता यामुळे काही तरुण अनवधानाने गुन्हेगारीच्या मार्गावर जात असल्याचे चित्र आहे. यामुळे केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत नाही, तर अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. या पार्श्वभूमीवर भारत पवार यांनी पोलीस अधीक्षकांना विनम्र आवाहन केले आहे की, केवळ कठोर कायदेशीर कारवाईपुरते मर्यादित न राहता प्रतिबंधात्मक आणि सुधारात्मक दृष्टिकोन स्वीकारणे काळाची गरज आहे. गुन्हे घडल्यानंतर शिक्षा देणे जितके आवश्यक आहे, तितकेच गुन्हे घडूच नयेत यासाठी प्रयत्न करणेही महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते, जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत छोटे-मोठे गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींसाठी नियमित समुपदेशन शिबिरे, मार्गदर्शन बैठका आणि जनजागृती उपक्रम राबविणे आवश्यक आहे. अनेक वेळा तरुण मंडळी गैरसमज, राग, मित्रांचा दबाव किंवा आर्थिक अडचणीमुळे चुकीच्या मार्गाला लागतात. अशा व्यक्तींना योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते समाजाच्या मुख्य प्रवाहात परत येऊ शकतात.

# काष्टीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथे जनता विद्यालय, कन्या विद्यालय, नवभारत विद्यालय, परिक्रमा संकुल यामध्ये इयत्ता दहावी मध्ये 85 ते 100 टक्के पर्यंत गुण मिळवून चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झालेल्या मुल व मुली अशा एकूण 39 गुणवंत विद्यार्थ्यांचा सहकार महर्षी काष्टी संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते सन्मान करुण विद्यार्थ्यांच्या पाठिवर शाबासकीची थाप दिल्याने त्यांना भविष्यातीर जीवनात नवी उर्जा मिळाली आहे.



दि.18 रोजी तालुक्यातील काष्टी येथे सकाळी 11 वाजता सहकार महर्षी काष्टी संस्थेच्या सहकार सभागृहात जेष्ठ नेते कैलासतात्या पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात 39 गुणवंत विद्यार्थ्यांचा विविध मान्यवरांच्या हस्ते सत्कार करुण सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते, माजी अध्यक्ष ॲड.विठ्ठलराव काकडे,शिवाजीराव पवार, काशिनाथ काळे,दादासाहेब कोकाटे, बाळासाहेब पाचपुते, लक्ष्मणराव पाचपुते, पोपटराव पाचपुते, सुभाष पाचपुते, सर्जेराव पाचपुते, संतोष माणिकराव पाचपुते, जयसिंग पाचपुते, यांच्यासह पदाधिकारी हजर होते.

यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते म्हणाले कि आजचा विद्यार्थी हे आमचे उद्याचे मोठे भविष्य आहे. कारण आम्ही पूर्वी शिक्षणाच्या योग्य सुविधा नसताना घडलो.परंतु आता शिक्षणासाठी अनेक सुविधा असताना आपला विद्यार्थी शाळेमध्ये गुरुचे चांगले आणि आदर्श ज्ञानदान घेऊन तो उद्याचा शास्त्रज्ञ, तसेच देश हितासाठी वेगवेगळ्या पदावर जावून अधिकारी होईल. तेव्हा आपल्या गावातील विद्यार्थी म्हणून आम्हाला आणि गावाला अभिमान वाटेल हेच सर्व होण्यासाठी तुम्हाला नवी उर्जा मिळण्यासाठी आम्ही ह्या सन्मान सोहळ्याचे आयोजन केले. जीवनात प्रत्येक आईवडिलांचे स्वप्न मुलांनी साकार करुण यशस्वी व्हावे याच सर्वांना शुभेच्छा आहेत असे पाचपुते म्हणाले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक व मुख्याध्यापक यांचाही सन्मान करण्यात आला.

यावेळी मंगल जोगदंड, हरिचंद्र शिंदे, सतिष शिंदे, निवृत्ती शेलार, माऊली माने,दिगंबर नलवडे, योगेश दांगट, नामदेव गावडे. यांच्यासह संस्थेचे सभासद, शिक्षक, पालक,विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. संचालक विठ्ठलराव काकडे यांनी प्रास्ताविक करुण सचिव गणेश पाचपुते यांनी आभार मानले. काष्टी गावातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी मध्ये अतिशय चांगले गुण मिळवून बाजी मारली.त्यांच्या यशाची गुणवंत्तेची दखल सहकार महर्षी काष्टी संस्थेने घेऊन आदर्श शिक्षक, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला.

## 'जिद्द पेरतांना' कादंबरीला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार जाहीर

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शिवबाबा वाघ प्रतिष्ठान (पिंपळगाव जलाल,ता. येवला,जि. नाशिक) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'शहादू शिवाजी वाघ स्मृती राज्यस्तरीय पाचव्या साहित्य कलाकृती पुरस्कारा'ची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षीचा अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार चांदा (जि.अहिल्यानगर) येथील प्रथितयश लेखक राजेश चांगदेव चौरे यांच्या "जिद्द पेरतांना"या कादंबरीला जाहीर झाला आहे. शिवबाबा वाघ प्रतिष्ठानच्या वतीने दि.१ मे २०२६ रोजी या पुरस्कारांची अधिकृत घोषणा करण्यात आली. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या एकूण २२ उत्कृष्ट कादंबऱ्या प्रतिष्ठानकडे प्राप्त झाल्या होत्या. या सर्व कादंबऱ्यांमधून परीक्षकांनी सखोल मूल्यमापन करून लेखक राजेश चौरे यांच्या 'जिद्द पेरतांना' या कलाकृतीची प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी एकमताने निवड केली. कादंबरीचे परीक्षण मा.प्रा.डॉ. आर आर जे इंगोले चांदवड (नाशिक) यांनी केले होते. तसेच या कादंबरीला भारत सन्मान २०२६ व अक्षर सागर साहित्य मंच गारगोटीचा राज्यस्तरीय उत्कृष्ट कादंबरी पुरस्काराने देखील गौरवण्यात आले आहे. उत्कृष्ट साहित्यकृतींची निवड झाल्याबद्दल साहित्य वर्तुळातून राजेश चौरे यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



## मुलांना मारून पुरावा नष्ट करणाऱ्या आईस ५ वर्षे कारावास

भोकर : (स. गांवकरी)

स्वतःच्या पोटच्या दोन निष्पाप चिमुकल्यांचा जीव घेऊन त्यांचे मृतदेह पुरून पुरावा नष्ट करणाऱ्या प्रकरणातील आरोपी आईस भोकर सत्र न्यायालयाने बुधवारी पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. पोलीस स्टेशन भोकर हद्दीतील मौजे पांडुर्णा शिवारात आरोपी धुरपताबाई गणपत निमलवाड (आई), वय २९ वर्षे, रा. पांडुर्णा ता. भोकर, जि. नांदेड हिने तिची मुलगी अनुसया (वय ४ महिने) व मुलगा दत्ता (वय २ वर्षे) हे भुकेने व्याकूळ होऊन नेहमी रडत असल्याने संतापाच्या भरात मुलगी अनुसया हिचे तोंड दाबून तिला जीवे मारून पांडुर्णा येथील पुलाखाली मातीमध्ये तिचा मृतदेह पुरला. तसेच मुलगा दत्ता याच्या नाका-तोंडात चिखल टाकून त्याचाही खून केला व मौजे मुगट शिवारातील माता साहेब गुरुद्वारासमोरील उसाच्या शेतातील पांदण रस्त्यावर मृतदेह त्याचा टाकल्याची बाब तपासात समोर आली. आरोपी क्र. १ हिने आरोपी क्र. २ व ३ यांच्या मदतीने फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांना जीवे मारण्याची धमकी देऊन दोन्ही मुलांचे मृतदेह मौजे पांडुर्णा येथील फिर्यादी यांच्या शेतात जाळून टाकले . यासंदर्भात मुलांचे आजोबा फिर्यादी गोविंद दादुजी निमलवाड (वय ८५) यांनी भोकर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. प्रस्तुत प्रकरणात सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त सरकारी अभियोक्ता सौ. अनुराधा रेड्डी (डावकरे) यांनी महत्त्वाचे एकूण सहा साक्षीदार तपासून परिस्थितीजन्य पुरावा सिद्ध केला. तसेच उच्च न्यायालयातील महत्त्वाचे न्यायनिवाडे दाखल करून अंतिम युक्तिवाद सादर केला. घटनेच्या वेळी आरोपीच्या आईची मानसिक स्थिती स्थिर असून तिने केलेल्या कृत्याची तिला पूर्ण जाणीव होती, असा युक्तिवाद सरकार पक्षाने न्यायालयासमोर मांडला. मा. सत्र न्यायाधीश मोहम्मद नासीर मोहम्मद सलीम यांनी आरोपीच्या मानसिक आजाराचा तसेच न्यायालयीन कोठडीत असताना वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या वैद्यकीय तपासणी अहवालाचा विचार करून आरोपीची आई मनोरुग्ण असल्यामुळे तिला कलम ३०२ अंतर्गत शिक्षा न ठोठावता निष्पाप मुलांचा खून केल्याप्रकरणी कलम ३०४ भाग-२ अंतर्गत ५ वर्षे सश्रम कारावास व १००० रुपये दंड तसेच कलम २०१ अंतर्गत २ वर्षे शिक्षा व १००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.तर १)कोंड्याबाई पांडुरंग राजेमोड वय ५० वर्ष, व २) माधव पांडुरंग राजेमोड वय पंचवीस वर्षे दोघे राहणार ब्राह्मणवाडा तालुका मुदखेड अनुक्रमांक एक व दोन आरोपीची आई व भाऊ दोघांना सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करण्यात आलेले आहे सदर प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक दिगंबर पाटील यांनी पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्यात पोलीस अधीक्षक अविनाश कुमार व अपर पोलीस अधीक्षक भोकर अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट पैरवी अधिकारी एएसआय फिरोजखान पठाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.



## सुखकर भविष्यासाठी जिल्हा परिषदेचा अभिनव उपक्रम

### सेवानिवृत्तीनंतरचे जीवन सक्षम व आनंदी व्हावे : मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या सेवाकाळात शासनामार्फत समाजासाठी महत्त्वपूर्ण कामे केलेली असून, त्यांची सेवा ही शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली आहे. सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांचे आर्थिक, सामाजिक तसेच आरोग्यदृष्ट्या जीवन अधिक सक्षम व सुखकर व्हावे, यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने दोन दिवसीय मार्गदर्शनपर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले.



जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, एसबीआयचे मुख्य व्यवस्थापक चव्हाण, व्यवस्थापक राऊत, पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे त्या म्हणाल्या, एखाद्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्ती स्वीकारणे हे सहज सोपे नसते. अनेक वर्षे नियमित कार्यालयीन कामकाज, सेवा व जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर निवृत्तीनंतर अचानक जीवनशैलीत बदल होतो. अशा वेळी आता पुढे काय हा प्रश्न अनेकांना पडतो. मात्र, सेवानिवृत्ती हा प्रत्येक सेवकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून, त्यानंतरचे जीवनही सकारात्मक, निरोगी आणि आनंदी पद्धतीने जगता आले पाहिजे. अनेकदा निवृत्तीनंतर मानसिक आणि शारीरिक बदल जाणवतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे निवृत्तीनंतरचे जीवन अधिक सुखकर व्हावे, ही जिल्हा परिषदेची जबाबदारी समजून या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने करण्यात आली. त्यानंतर दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त उपस्थितांनी शपथ घेतली. तसेच कार्यक्रमाच्या नियोजनासंदर्भातील माहितीपटही यावेळी दाखविण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांनी आपल्या आवडी जोपासाव्यात असे सांगत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपलेखा व वित्त अधिकारी विशाल हिवरे यांनी केले तर सूत्रसंचालन मिलिंद व्यवहारे यांनी केले. या प्रशिक्षण शिबिराला सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आज या प्रशिक्षण शिबिराचा समारोप करण्यात येणार आहे.

## नगरच्या जागेसाठी शिंदेंची शिवसेना आग्रही

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राज्यात विधानपरिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे. पक्षीय बलाबल पाहता या सर्वच जागांवर राज्यात सत्तेत असलेल्या महायुतीचे प्राबल्य आहे. विरोधी महाविकास आघाडीला नगण्य स्थान आहे. मात्र सत्ताधारी महायुतीत प्रत्येक जागेवरून रस्सीखेच सुरू आहे. अहिल्यानगर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेसाठी एक सदस्य निवडून जाणार आहे. या जागेसाठी भाजपकडून माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. मात्र मागील निवडणुकीतील गणिते पाहता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना नगरच्या जागेसाठी आग्रही आहे. पक्षाचे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी नगरच्या जागेसाठी आग्रही भूमिका मांडली असून महायुतीच्या राजकारणात नगर जिल्ह्यात पक्षाला बळकटी देण्यासाठी धनुष्यबाण चिन्हावरील उमेदवार देण्याची मागणी केली आहे. नगर जिल्ह्यातील विधानपरिषदेच्या उमेदवारीसाठी शिंदेंच्या शिवसेनेकडून तीन – चार जण इच्छुक आहेत शिवसेना हा पक्ष आदेशावर चालणारा आहे शेवटी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्णय अंतिम राहील असे जिल्हाप्रमुख अनिल शिंदे म्हणाले. भारतीय जनता पक्षाने नगर जिल्ह्यात प्रा राम शिंदे, विवेक कोल्हे, सुनील कर्जतकर यांना विधानपरिषदेत संधी दिली आहे. त्यामुळे आता राजकीय समतोल राखण्यासाठी भाजपने शिंदेंच्या शिवसेनेला संधी देण्याची मागणी होत आहे.




# रावेर तालुक्यात पेट्रोल डिझेल तुटवडा

### पेट्रोल पंप बंद अवस्थेत

रावेर : (स. गांवकरी)

रावेर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल डिझल तुटवड्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून , तालुक्यातील अनेक पेट्रोल पंप बंद अवस्थेत दिसून येत आहेत . तर काही पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा लागलेल्या दिसून येत आहेत. अचानक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे नागरिक, शेतकरी, व्यापारी तसेच प्रवासी वर्ग मोठ्या अडचणीत सापडला आहे. सकाळपासूनच पेट्रोल मिळवण्यासाठी वाहनधारक पेट्रोल पंपांवर गर्दी करत असून अनेक ठिकाणी तासन्तास प्रतीक्षा करूनही पेट्रोल मिळत नसल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.




तालुक्यातील काही पेट्रोल पंपांवर “स्टॉक संपला” अशा सूचना लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे उपलब्ध असलेल्या काही मोजक्या पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली आहे. दुचाकी, चारचाकी तसेच मालवाहतूक वाहनांच्या रांगा रस्त्यापर्यंत पोहोचत असल्याने वाहतुकीची कोंडीही निर्माण होत आहे. पेट्रोलचा पुरवठा सुरळीत नसल्याने अनेक नागरिकांना रोजच्या कामासाठी बाहेर पडणे कठीण झाले आहे.

शेतकरी वर्गालाही या तुटवड्याचा मोठा फटका बसत आहे. शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री, पंप, ट्रॅक्टर तसेच मालवाहतूक वाहनांसाठी इंधनाची गरज असताना पेट्रोल उपलब्ध होत नसल्याने शेतीची कामे खोळंबली आहेत. व्यापारी वर्गालाही मालाची वाहतूक करण्यात अडचणी येत असून छोट्या व्यवसायांवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने अनेक जण पेट्रोलचा अतिरिक्त साठा करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे उपलब्ध साठ्यावर अधिक ताण निर्माण होत आहे. काही ठिकाणी पेट्रोल मर्यादित प्रमाणात देण्यात येत असल्याचेही समोर आले आहे. अचानक वाढलेल्या गर्दीमुळे पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांनाही मोठ्या तणावाखाली काम करावे लागत आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांकडून प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रावेर तालुक्यात पुरेशा प्रमाणात पेट्रोलचा साठा उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. तसेच इमर्जन्सी सेवा, रुग्णवाहिका, शेतकरी आणि आवश्यक सेवांसाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, अशी मागणीही पुढे येत आहे. प्रशासनाने वेळीच योग्य नियोजन करून पेट्रोलचा नियमित पुरवठा सुरू केला नाही तर येत्या काही दिवसांत परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांचे हाल टाळण्यासाठी संबंधित विभागाने तातडीने हस्तक्षेप करणे आवश्यक असल्याचे मत सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# रामानंद संप्रदायाच्या आध्यात्मिक केंद्रात भव्य प्रबोधन-प्रवचन कार्यक्रम

## भाविकांनी घेतला सत्संगाचा लाभ

डांग (गुजरात) : (स. गांवकरी)

डांग जिल्ह्यातील आहवा तालुक्यातील मालेगाव (सापुतारा) येथे दि. 20/05/2026 रोजी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्या रामानंद संप्रदाय डांगतर्फे भव्य सत्संग केंद्रात प्रबोधन-प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी डांग जिल्ह्यातील तिन्ही तालुक्यांसह महाराष्ट्रातील सुरगाणा तालुक्यातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहिले होते.या कार्यक्रमादरम्यान पालखी यात्रा, हरिपाठ, आरती तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रम श्रद्धा, भक्तिभाव आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी जगद्गुरू नरेंद्र महाराज संस्थानचे प्रबोधनकार कालिदास उराडे यांनी उपस्थित भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन केले.



आपल्या प्रवचनात त्यांनी “नरसेवा हीच नारायण सेवा” असल्याचे सांगितले. संस्थानामार्फत समाजहितासाठी राबविण्यात येणाऱ्या ४१ प्रकारच्या सामाजिक सेवा उपक्रमांची माहिती देताना त्यांनी हजारो लोक या सेवाकार्यांचा लाभ घेत असल्याचे आह्वान केले.

तसेच संस्थानामार्फत व्यसनमुक्ती अभियान, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, देहदान व अवयवदान जनजागृती, अपघातावेळी मोफत रुग्णवाहिका सेवा, पूरग्रस्तांना मदत, नैसर्गिक आपत्तीत सहाय्य, स्वच्छता अभियान तसेच “ब्लड एड नीड” यांसारख्या विविध सामाजिक उपक्रमांद्वारे सातत्याने समाजसेवा केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. संस्कृती आणि धर्माच्या संरक्षण व जतनासाठीही संस्थान निरंतर कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आध्यात्मिक मार्गदर्शन करताना त्यांनी भाविकांना दररोज किमान १० मिनिटे भक्ती करण्याचा तसेच “स्वप्नातही कोणाचे वाईट विचार करू नयेत” असा संदेश दिला. जगद्गुरूंच्या “तुम्ही जगा आणि इतरांनाही जगण्यास मदत करा” या परोपकारी मंत्राचे पालन करून स्वतःचे आणि समाजाचे कल्याण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांनी तल्लीन होऊन प्रवचनाचा लाभ घेत आध्यात्मिक समाधान अनुभवले.


# थोडक्यात पण महत्वाचे



## रेनवडीच्या बंधाऱ्याचे दुरुस्ती झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान

खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील पिंपरी कावळ येथीलकुकडी नदीवरील रेनवडी कोल्हापूर बंधाऱ्याची रेलिंग तुटली होती. त्यामुळे या बंधाऱ्यावर अपघातदेखील झाले होते. त्यासंदर्भात पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पांडुरंग पवार यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास मंडळाचे कार्यकारी संचालक हनुमंत गुणाले, कुकडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर, पुणे परीमंडळ अधिकारी वैशाली नारकर यांच्याकडे या कोल्हापूर बंधाऱ्याची दुरुस्तीबाबत निवेदनाद्वारे मागणी केली होती. पवार यांनी या बंधाऱ्याच्या संदर्भात सतत पाठपुरावा केल्यामुळे त्यांच्या मागणीला यश आले असून रेनवडी या बंधाऱ्यासह अजून तीन बंधारे दुरुस्तीसाठी 34 लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. जुन्नर व पारनेर तालुक्यातील रेनवडी व पिंपरी कावळ दरम्यान कुकडी नदीवर सन 1995 च्या दरम्यान कोल्हापूर पद्धतीचा हा बंधारा बांधण्यात आला होता. अनेक वर्षांचा बंधारा, झाल्यामुळे दोन्ही काठचा भरावा वाहून गेला होता. तसेच पुलावरील रेलिंग सुद्धा तुटले होते. आता या पुलाला रेलिंग बसवली असून कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.या कोल्हापूर बंधाऱ्यामुळे पिंपरी कावळ, पारगाव तर्फे आळे, मंगरूळ, रेनवडी तसेच परिसरातील गावातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ होत आहे. तसेच या बंधाऱ्यावरून येण्या जाण्यासाठी रस्ता असून पुणे अहिल्यानगर येथील ग्रामस्थ व शेतकऱ्यांची चांगली सोय झाल्याने माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पांडुरंग पवार यांचे परिसरातील नागरिक व शेतकरी समाधान व्यक्त करून आभार मानत आहेत.

## नारायणगाव येथे मोफत कुस्ती प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



खोडद (स. गांवकरी) : राजमुद्रा सामाजिक सेवा संस्था व जुन्नर तालुका कुस्तीगीर संघ आणि शिवनेरी अॅथलेटिक सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने नारायणगाव येथे प्रथमच मोफत कुस्ती प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर 1 ली ते 9 वीच्या विद्यार्थ्यांसाठी असून ते 1 मे ते 30 मे 2026 या कालावधीत दररोज सायंकाळी 5 ते 7 या वेळेत हनुमान मंदिर परिसर, हनुमान चौक नारायणगाव येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये कुस्ती कोच सुरेश काकडे व जिल्हा कुस्तीगर संघाचे उपाध्यक्ष विलास कदम हे मुख्य प्रशिक्षक म्हणून मुलांना कुस्तीचे मार्गदर्शन करणार आहेत. महिनाभराचे हे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर रविवार दि. 31 मे रोजी सर्व सहभागी मुलांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व रोख बक्षीस देऊन गौरविण्यात येणार आहे. या मोफत कुस्ती प्रशिक्षण उपक्रमासाठी ग्रामपंचायत नारायणगाव व वारुळवाडी,हर्षल वाजगे,गुंजाळ ट्रेडर्स तसेच पंचायत समिती सदस्या जयश्री बनकर यांनी विशेष सहकार्य व प्रोत्साहन दिले आहे.

# समर्थ आयटीआयच्या विद्यार्थ्यांची मल्टिनॅशनल कंपनीत निवड

बेल्हे : (स. गांवकरी)



समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित,समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) बेल्हे येथील विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड होत असून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत.नुकतेच तईकिशा इंजिनियरिंग इंडिया प्रा. लि. (बहुराष्ट्रीय कंपनी) कोंढापुरी, रांजणगाव,पुणे या कंपनीच्या कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कंपनीचे प्रतिनिधी डेप्युटी मॅनेजर,एचआर व ॲडमिन रविंद्र करवंदे, प्रॉडक्शन इंजिनियर अमर गोडसे तसेच वेल्डिंग समन्वयक श्री. उमाकांत मालपे उपस्थित होते.

या कॅम्पस मुलाखतीत विविध ट्रेडमधील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये वेल्डर ट्रेडमधून प्रतीक बढे,रोहन रोकडे,सोहम भोर व इम्रान इनामदार यांची निवड झाली.फिटर ट्रेडमधून नाविन्य नरवडे व ऋषी कोरडे यांची निवड करण्यात आली. तसेच कोपा (कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट) ट्रेडमधून आनंद खुपटे यांची निवड झाली. ड्राफ्ट्समन मेकॅनिकल ट्रेडमधून साक्षी काटे,किरण जाधव व दिपक गागरे यांची निवड करण्यात आली. इलेक्ट्रॉनिक्स ट्रेडमधून रुतिक डेरे तसेच इलेक्ट्रिशियन ट्रेडमधून आयुष जाधव यांची निवड झाली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,प्राचार्य पांडुरंग हाडवळे,उपप्राचार्य विष्णू मापारी,प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर सर्व विभागांचे प्राचार्य,शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी विलास सोनवणे,विकास कणसे,निकेश औटी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अखेर दिवा शहराला मिळाला स्वतंत्र पिनकोड.

ठाणे : (स. गांवकरी)



■ विजय भोईर यांच्या मागणीला यश

आता तरी जागा हो दिवेकर व भारतीय जनता पार्टीचे विजय अनंत भोईर यांच्या अनेक वर्षांपासून मागणी असलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. दिवा शहराचा पिनकोड पूर्वी मुंब्रा व दिवा शहर सलग्न असल्याने अनेक अडचनींचा सामना करावा लागत असे पत्रव्यवहारासह अनेक महत्वाची कागदपत्रे व पार्सलसाठी मुंब्रा शहरावर अवलंबून रहावे लागत असे तसेच मुंब्रा व दिवा शहरे मिळून पिनकोड समाविष्ट होता परंतु दिवा शहराला स्वतंत्र पिनकोड मिळावा या मागणीसाठी विजय भोईर यांनी अनेक वर्षांपासून लढा सुरु ठेवला होता. अखेर आज यांच्या मागणीला यश मिळाले आहे. आता मुंब्रा शहरासाठी 400612 पिन कोड असणार असून दिवा शहरासाठी नविन 400611 हा पिनकोड असणार असल्याचे अधिकृत प्रशासनाकडून जाहिर करण्यात आले आहे. विजय अनंत भोईर यांनी "आता तरी जागा हो दिवेकर" या सामाजिक संस्थेच्या मार्फत त्यांनी स्वतः GPO, मुंबई हेड ऑफिस तसेच केंद्रीय पत्रव्यवहार केले होते.

# गाभाऱ्यामध्ये आंबा फळाची सजावट

पाथर्डी : (स. गांवकरी)

श्रीक्षेत्र मोहटा देवस्थानामध्ये भाविक व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून वैशिष्ट्यपूर्ण अशी आंब्याची सजावट देवीच्या गाभाऱ्यामध्ये करण्यात आली. आंब्याचे विविध वाण यासाठी वापरण्यात आले. उन्हाळ्यामध्ये देवापुढे रसदार फळे, अर्पण करत या दिवसांमध्ये अशा फळांचे सेवन करण्याचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न सेवा कार्यातून करण्यात आला आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात भाविकांना विविध प्रकारच्या सोयी सुविधा देण्याबाबत व प्रथा परंपरांचे पालन करत धार्मिक विचारांचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी मोहटा देवस्थान समिती सर्वाधिक क्रियाशील आहे. राज्याच्या विविध भागातून दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. सध्या अधिक महिना व उन्हाळी सुट्ट्यांचा हंगाम असल्याने देवी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी वाढली आहे. देवस्थान समितीने भाविकांना उन्हाचा त्रास दर्शन रांगेमध्ये होऊ नये म्हणून गार पाण्याच्या फवाऱ्याची लोकसहभागातून सोय केली.



## उत्सवाची परंपरा

या सेवेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक लहान मोठे भाविकही उन्हाच्या झळ्यांपासून बचाव करण्यासाठी अशा फवाऱ्याच्या पाण्यापुढे उभे राहून थंडावा मिळवतात. देवस्थान समिती च्या पुढाकाराने कर्मचारी व भाविकांच्या योगदानातून आंबा फळांची अत्यंत आकर्षक अशी मांडणी करण्यात आली. यामुळे देवीच्या मूर्ती चे सात्विक सौंदर्य अधिकच खुलले. आंब्याचा सुगंधही दर्शन घेणाऱ्या भाविकांचे लक्ष वेधून घेत होता. महापूजा झाल्यानंतर सर्व भाविकांना प्रसाद म्हणून आंबे वाटण्यात आले. अधिक महिन्यामध्ये देवीचा प्रसाद दर्शन रांगेतील भाविकांना मिळाल्याने भाविकांनाही समाधान वाटले. उन्हाळ्यामध्ये शरीराला रसदार फळांचा आहार अत्यंत लाभदायक असून विविध प्रकारच्या आजारांपासून दूर ठेवतो. पचन संस्था चांगली राहून सात्विक आहार मिळाल्याने थकवा जाणवत नाही. माणसाची चैतन्य शक्ती रसदार फळांमुळे टिकून राहते. त्यामुळे पूर्वजांनी याला धार्मिक प्रथेचे रूप देत विविध प्रकारची रसदार फळे प्रसाद स्वरूपात ग्रहण केले जात असल्याने प्रसाद म्हणून का होईना खाण्यामध्ये फळांचा समावेश होतो. विशेषतः टरबूज, खरबूज, आंबा अननस, अंजीर, चिकू, संत्री मोसंबी याबरोबरच ग्रामीण भागातील श्रद्धाळू भाविक रानफळे म्हणजे जांभूळ, करवंदे सुद्धा अर्पण करतात. करवंदांमुळे रक्त शुद्धी व रक्त वाढ होते. शरीराला विविध उपयोगी पोषक घटक मिळतात, तर जांभळामुळे भूक वाढून मधुमेहासारख्या घातक आजारावर नियंत्रण राखता येते. असे आयुर्वेद शास्त्रात सांगितले आहे.

## अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर. ✆:०२४१-२३२६९१४

जा. क्र. पतसंस्था फेडरेशन /३४१/ सन २०२६ — दिनांक -१९/०५/२०२६

**स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम**

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.,जामखेड,ता.जामखेड,जि.अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अ.नगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण / दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार,गहाण,दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द / निरर्थक ठरतील.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत | | | | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वसुली दा.रक्कम | गट नं./प्लॉट नं./मिळकत नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | पुर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | कर्ज - सुमन विजय जाधव यांची मिळकत व करिता<br>जामि - संदिप रामदास गायकवाड यांची मिळकत<br>जामि- सुरेश आण्णा गायकवाड | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>ता.जामखेड | ७३६९६/-<br>+इतरखर्च+ होणार व्याज | ११८६पैकी<br>११८६पैकी<br>११८६ पैकी<br>११८६/१ | ०.०३पैकी<br>०.०२पैकी<br>०.०२पैकी<br>०.०१.१५ | ०.०३<br>०.०२<br>०.०२<br>४.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| २. | कर्ज - बाळु साहेबराव गायकवाड करिता<br>संमतीदार- किसन साहेबराव गायकवाड यांची मिळकत<br>जामि - ओंमकार अशोक तिवाटणे<br>जामि- मुड्डे सचिन शिवचलप्पा | जामखेड<br>ता. जामखेड | २०३७२०/-<br>+इतरखर्च+ होणार व्याज | ११८४/१ | ०.००६२ | ०.०१ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ३. | कर्ज - राजेंद्र मारुती सदाफुले यांची मिळकत व करिता<br>जामि - गोकुळ शाहुराव पाबळ यांची मिळकत<br>जामि - शाहुराव भागुजी पाबळ | जामखेड<br>मोहा<br>ता. जामखेड | २३५४०/-<br>+इतरखर्च+ होणार व्याज | ११८६<br>५५९ | ०.००८२<br>०.६३ | ०.०१<br>१.११ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ४. | कर्ज - अमोल दत्तात्रय पंडित करिता<br>जामि - अनिल राजाराम हजारे यांची मिळकत<br>जामि- अशोक बाबासाहेब कोळपकर यांची मिळकत<br>संमतीदार- सुमन दत्तात्रय पंडित याची मिळकत | नान्नज<br>नान्नज<br>नान्नज<br>नान्नज<br>जामखेड<br>ता. जामखेड | १५५९३०३/-<br>+इतरखर्च+ होणार व्याज | १५०<br>४०९<br>१२००<br>तारणातील मि.९८२/१<br>१५११/४ | १.५८<br>०.०३<br>०.५६<br>०.८०<br>०.०२.०० | १.८२<br>०.०७<br>१.१०<br>०.३९<br>०.०४ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ५. | कर्ज - संगिता प्रकाश नागरगोजे करिता<br>जामि - महादेव शहादेव राख यांची मिळकत<br>जामि - रमेश प्रकाश क्षिरसागर<br>जामि- दादासाहेब मोहन वारे | जामखेड<br>ता. जामखेड | १७३३६०१/-<br>+इतरखर्च+ होणार व्याज | १३५६ | ०.०१.०० | ०.०१.०० | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ६. | कर्ज - अनिता विलास जगदाळे यांची मिळकत व करिता<br>जामि - प्रकाश पंढरीनाथ जगदाळे यांची मिळकत<br>जामि - बाबासाहेब वामन खरात यांची मिळकत | चौंडी<br>जामखेड<br>चौंडी<br>चौंडी<br>चौंडी<br>ता. जामखेड | ५११०१८/-<br>+इतरखर्च+ होणार व्याज | १९२/१२<br>२१७<br>९३<br>१३५<br>९३ | ०.८०.००<br>१.७६.००<br>०.०१.००<br>१.६०<br>०.४०.०० | १.२०<br>१.२९<br>-<br>१.३८<br>०.२१ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ७. | कर्ज - विजय मारुती जाधव करिता<br>जामि - सुमन विजय जाधव यांची मिळकत<br>जामि- रामा मारुती गायकवाड | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>ता.जामखेड | ७७९९९/-<br>+इतरखर्च+ होणार व्याज | ११८६<br>११८६पैकी<br>११८६पैकी | ०.०१.७२<br>०.०२.००पैकी<br>०.०३.००पैकी | ०.०२<br>०.०२<br>०.०३ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |
| ८. | कर्ज - मुरलीधर चंदुलाल चव्हाण यांची मिळकत व करिता<br>जामि - मोहन अर्जुन सुरवसे यांची मिळकत<br>जामि - बबन पांडुरंग कोथंबिरे यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | ३३१३०/-<br>+इतरखर्च+ होणार व्याज | मा.क्र. १०३<br>३५*२६यात आर सी सी मजली इमारत बांधकाम<br>४०७<br>४२०पैकी<br>७३७/१/१/अ | ८४.५४ चौमी<br>०.८१<br>१.६१पैकी<br>०.१० | -<br>०.६८<br>३.४०<br>०.०७ | मुळ नकाशा प्रमाणे | | | |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर
दिनांक -१९/०५/२०२६

सिल

सही
(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह.
फेडरेशन मर्या,अ.नगर

# पडघा बोरिवलीत गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारातून शिक्षण आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचा प्रेरणादायी संदेश

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरिवली गाव शिक्षण, सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या नव्या आदर्शामुळे पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. बोरिवली पडघा येथील प्रसिद्ध “सोहराब गुजर हॉल” येथे एसएससी (दहावी) आणि एचएससी (बारावी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामपंचायत बोरिवली, माजी सरपंच सोहराब गुजर आणि अॅड. झियाद सोहराब गुजर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात मुस्लिम व बिगर-मुस्लिम विद्यार्थ्यांचा एकत्रित सन्मान करून सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश देण्यात आला.

या भव्य सोहळ्याचे आकर्षक आणि प्रभावी सूत्रसंचालन टेनिस क्रिकेट स्पर्धांमधील लोकप्रिय समालोचक सिद्दीक भाभे यांनी केले. आपल्या खास शैलीत, शायरी आणि विनोदी अंदाजातून त्यांनी संपूर्ण कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण



निर्माण केले. कार्यक्रमाला राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक आमदार शांताराम मोरे, भिवंडी पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (एनसीपी) भिवंडी ग्रामीणचे अध्यक्ष गणेश गुलवी तसेच अभियंता दुर्राज कामानकर (के. के.) उपस्थित होते.

याशिवाय पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक देशमुख आणि पोलीस अधिकारी रुपेश जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या यशाचे अभिनंदन केले. बोरिवली ग्रामपंचायतीचे सरपंच अनवर अब्दुल पिंजारी आणि ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना ट्रॉफी, सन्मानचिन्हे आणि इतर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी आमदार शांताराम मोरे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, पालकांच्या त्यागाचे आणि शिक्षकांच्या योगदानाचे विशेष कौतुक केले. “शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे सर्वात मोठे साधन आहे. विद्यार्थीच उद्याच्या प्रगत समाजाचे शिल्पकार आहेत,” असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मीय समाजघटकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. माजी सरपंच नदीम मुल्ला, शमून खोत तसेच ग्रामपंचायत सदस्य अकबर अब्दुल्ला खोत यांनीही उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. खुर्रम नाचण, साजिद खोत, अल्ताफ नाचण, सादात मुल्ला, वासिम जवरे, कैस बर्डी आणि अरफात हरे यांसारख्या स्थानिक तरुणांनी शिक्षण आणि भाईचाऱ्याची परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमात तालुका व जिल्हा पातळीवर उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट निकालासाठी कोकण मुस्लिम एज्युकेशन सोसायटी संचालित पडघा बोरिवली हायस्कूलचाही गौरव करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका जवेरिया काजी यांचा ट्रॉफी, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

सोहराब गुजर हॉलमध्ये आयोजित या भव्य कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. संपूर्ण हॉल खचाखच भरल्याने परिसरातील शिक्षणाविषयी वाढती जागरूकता आणि सकारात्मक सामाजिक बदल अधोरेखित झाला.

हा कार्यक्रम केवळ गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारापुरता मर्यादित न राहता सामाजिक एकात्मता, शिक्षणाचा प्रसार आणि सर्वधर्मीय ऐक्याचा प्रेरणादायी संदेश देणारा ठरला. आयोजक सोहराब गुजर आणि अॅड. झियाद सोहराब गुजर यांच्या या उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी अॅड. झियाद सोहराब गुजर यांनी सर्व मान्यवर, पालक, शिक्षक आणि नागरिकांचे आभार मानले. त्यानंतर उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

# खरीप पीक विम्याच्या प्रतीक्षेत बिलोली-कुंडलवाडीचे शेतकरी हवालदिल

## दोन दिवसांत रक्कम न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

बिलोली : (स. गांवकरी)

ऐन हंगामात सोयाबीनच्या झालेल्या अतोनात नुकसानीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या बिलोली आणि कुंडलवाडी मंडळातील शेतकऱ्यांना अद्याप २०२५ चा खरीप पीक विमा मिळाला नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. बिलोली तालुक्यातील इतर सर्व मंडळांना विम्याचा लाभ मिळाला असताना, केवळ या दोन मंडळांनाच का डावलण्यात आले, असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत.



शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, खरीप २५ चा पीक विमा मंजूर झाला आहे. मात्र, प्रशासकीय अनास्थेमुळे ही रक्कम अजूनही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली नाही. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे सोयाबीनचे पीक हातचे गेले असून शेतकरी पुरता कोलमडला आहे. त्यातच हक्काचा विमा अडकून पडल्याने त्यांच्यापुढील आर्थिक अडचणी अधिकच गडद झाल्या आहेत.या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी बिलोली मंडळातील सर्व शेतकऱ्यांच्या वतीने सरपंच सौ. रुक्मिणबाई गंगाधर माकुतवार यांच्या नेतृत्वाखाली माननीय उपविभागीय अधिकारी उपविभागीय कार्यालय बिलोली यांना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी आणि देगलूर-बिलोली मतदारसंघाच्या आमदारांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

"येत्या दोन ते तीन दिवसांत विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली नाही, तर नाईलाजास्तव प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा स्पष्ट आणि निर्वाणीचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

या निवेदनावर गणेश पाटील बोडके, राजिन्ना बाबुराव कांपिलवार, गंगाधर विठ्ठल शिरगिरे, धोंडिबा रामचंद्र प्याटेकर, मोहम्मद बाबुमिया यांच्यासह शेकडो त्रस्त शेतकऱ्यांनी स्वाक्षऱ्या करून प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला आहे.आता प्रशासन यावर काय पाऊल उचलते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.



भोकर : राजमाता-राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त भोकर येथे होणाऱ्या जयंती महोत्सवासाठी समितीची स्थापना करण्यात आली असून, जेष्ठ समाजसेवक नागोराव शेंडगे यांची अध्यक्षपदी तर शंकरराव डांगरे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. सचिवपदी सुशीलकुमार शिंदे यांची निवड करण्यात आली.

## थोडक्यात बातम्या...

### अहिल्यानगर जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचे तीन जिल्हाध्यक्ष ; यांना मिळाली संधी



अहिल्यानगर (स. गांवकरी) : काँग्रेस पक्षाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आता तीन जिल्हाध्यक्ष नियुक्त केले आहेत. पक्षाने ‘संघटन सृजन अभियान’तर्गत पक्ष संघटनेत फेरबदल करण्याचे जाहीर केले होते. प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. नगर जिल्ह्यात तीन जिल्हाध्यक्ष नियुक्त करताना दोघांची पुनर्नियुक्ती झाली आहे तर तिसऱ्या अध्यक्षाची नवीन नियुक्ती झाली आहे. काँग्रेस पक्षाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी दीप चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्षपदी सचिन गुजर (श्रीरामपूर) व दक्षिण जिल्हाध्यक्षपदी किरण पाटील (कर्जत ) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे अखिल भारतीय सरचिटणीस वेणुगोपाल यांनी या निवडी जाहीर केल्या. दीप चव्हाण यापूर्वी शहर जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत होतेच तर सचिन गुजर यांच्याकडे जिल्हाध्यक्ष म्हणून पूर्ण जिल्ह्याचे प्रभारी पद होते. आता ग्रामीणसाठी दोन स्वतंत्र जिल्हाध्यक्ष नियुक्त करण्यात आले आहेत. किरण पाटील पूर्वी कर्जत तालुकाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. नियुक्त करण्यात आलेले तिघेही माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे कट्टर समर्थक आहेत. काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या पक्ष संघटनेत बदल घडवण्यासाठी ‘संघटन सृजन अभियान’ जाहीर केले होते. त्यावेळी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले पक्ष निरीक्षक तथा ओडिशाचे माजीमंत्री शंकर राऊट यांनी संघटनेला नवीन चेहरा देण्यासाठी फेरबदल करण्याचे जाहीर केले होते. मात्र प्रत्यक्षात तसे घडलेले नाही. किरण पाटील वगळता दीप चव्हाण व सचिन गुजर यांची फेरनियुक्ती झाली आहे.

### लग्नास विरोध करत पती-पत्नीला मारहाण ; नगर तालुक्यातील घटना

अहिल्यानगर (स. गांवकरी) : लग्नास विरोध असल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून पती-पत्नीला लाकडी दांडके आणि गजाने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना वडगाव तांदळी (ता. अहिल्यानगर) परिसरात घडली. याप्रकरणी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात सात जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ऋतुजा भिमराज धाडगे (वय २२, रा. वडगाव तांदळी, ता. अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार त्यांचा भाऊ ऋषिकेश लक्ष्मण कळमकर (रा. गांधीनगर, बोल्हेगाव), विशाल गोल्हार, ओंकार सांगळे (पूर्ण नावे माहिती नाही, दोघे रा. बोल्हेगाव), आकाश केदार (पूर्ण नाव माहिती नाही, रा. निंबळक, ता. अहिल्यानगर) तसेच इतर अनोळखी चार जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सारसनगर परिसरात तरूणाला मारहाण करत लुटले

अहिल्यानगर (स. गांवकरी) : पैसे उसने देण्यास नकार दिल्याने एका तरूणाला दारूच्या नशेत शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. तरूणाच्या खिशातील रोकड आणि मोबाईल जबरदस्तीने काढून घेत जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना सारसनगर येथील यश अपार्टमेंटसमोरील पुलाजवळ सोमवारी (१८ मे) घडली असून, या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात मंगळवारी (१९ मे) गुन्हा नोंदवण्यात आला आहे. शुभम अनिल हराळ (वय २६ रा. मधुबन कॉलनी, चिपाडे मळा, सारसनगर) असे जखमी तरूणाचे नाव असून त्यांनी फिर्याद दिली आहे. मयुर छबुराव कांडेकर (रा. सारसनगर), गोट्या रासकर (पूर्ण नाव माहिती नाही, रा. सारसनगर) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी शुभम हे सारसनगर भागातून जात असताना दोन्ही संशयित आरोपी दारू पिऊन त्या ठिकाणी आले. तू बरेच दिवस झाले मला भेटला नाही असे म्हणून मयुर याने शुभमकडे दोन हजार रूपये उसने मागितले. शुभमने माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगताच आरोपींचा पारा चढला. पैसे न दिल्याच्या रागातून आरोपींनी शुभमला शिवीगाळ केली. त्यानंतर मयुर याने हातातील लाकडी दांडक्याने शुभमवर हल्ला केला, तर त्याचा साथीदार गोट्या रासकर याने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता आरोपी मयुर याने शुभमच्या खिशातील दोन हजार रूपयांची रोकड आणि मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. या घटनेबाबत जर कोणाला सांगितले, तर तुला जिवे मारून टाकीन अशी धमकी देऊन आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

### स्वारातीम विद्यापीठात 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस' संपन्न

अहिल्यानगर (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये आज, दि.२१ मे २०२६ रोजी 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस' अत्यंत गांभीर्याने आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या स्वागत कक्षामध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी उपस्थितांना दहशतवाद आणि हिंसाचाराविरुद्ध लढण्याची आणि देशात शांतता, बंधुभाव टिकवून ठेवण्याची सामूहिक प्रतिज्ञा दिली. यावेळी विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत या प्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, ज्ञान स्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदिश कुलकर्णी तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# 'प्रशासक राज' काळात प्रशासक आणि ग्रामसेवकांत समन्वयाचा अभाव; विकासकामांना ब्रेक

तामसा : (स. गांवकरी)

प्रशासक काळात गावच्या विकासासाठी ग्रामसेवक आणि प्रशासक यांच्यात समन्वय आवश्यक असताना, अंतर्गत वादामुळे गावाच्या विकासाला फटका बसत आहे. शासनाने या गंभीर परिस्थितीकडे लक्ष देऊन ग्रामपंचायतींचा कारभार सुरळीत चालण्यासाठी वादग्रस्त ग्रामसेवकांना हटवून नव्या ग्रामसेवकांची नियुक्ती करण्यासाठी ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी सामान्य नागरिकांतून जोर धरत आहे.

हदगाव तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतींवर सध्या 'प्रशासक राज' आहे. परंतु काही ग्रामपंचायतीत ग्रामसेवक बदला, तेंव्हाच प्रशासकाचा कारभार चालवू, असा नारा सरपंच प्रशासकांनी लावल्याने अनेक ग्रामपंचायतीत सरपंच आणि ग्रामसेवक यांच्यातील समन्वयाचा अभाव चव्हाट्यावर आला आहे. या नव्या वादामुळे गावपातळीवरील विकासकामांना अक्षरशः ब्रेक लागला असून प्रशासनाने याकडे वेळीच लक्ष देण्याची व वादग्रस्त ग्रामसेवकांना हटविण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

शासनाने मुद्दत संपलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुका होईपर्यंत कार्यकाळ संपलेल्या सरपंचांनाच प्रशासक म्हणून जबाबदारी बहाल केली आहे. परंतु अनेक ठिकाणी ग्रामसेवक आणि माजी सरपंच यांच्यातील विसंवादामुळे ग्रामपंचायतींचा कारभार विस्कळीत झाला आहे. समन्वयाचा अभावामुळे गावपातळीवर विकासकामे करण्यात अडथळे निर्माण होत आहेत. प्रशासक काळातील भ्रष्टाचार, अनधिकृत कामे, रक्कमेचा अपहार, उर्वरित गैरप्रकारांचे खापर प्रशासकाच्या डोक्यावर फुटू नये. याची दक्षता घेऊन काही गावामध्ये तर ग्रामसेवक बदला, तरच प्रशासक म्हणून काम पाहू, अशी अट माजी सरपंचांनी घातल्याची जोरदार चर्चा आहे. विशेष म्हणजे, निवडणुका रखडल्याने प्रशासक व्यवस्थेचा कालावधी वाढत चालला आहे. या काळात गावाच्या विकासापेक्षा व्यक्तिगत मतभेद आणि अधिकारांची रस्सीखेच अधिक महत्त्वाची ठरत आहे. समन्वयाचा अभावामुळे अनेक ग्रामपंचायतींमध्ये आजूनही प्रशासक समिती गठीत नाही, मासिक बैठका नाहीत, निर्णय प्रक्रिया ठप्प आहे, कर वसुली, ईतर महसूल रक्कम बँक खात्यात जमा केली जात नाही, कामगारांचा पगार नाही, शासकीय योजना, विकास निधीची कामे, स्वच्छता, पाणीपुरवठा, लाईट, रस्ते दुरुस्ती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. अंतर्गत वादामुळे गावातील सामान्य नागरिकांची विकासकामे रखडली आहेत. विविध योजनांच्या मंजुरीसाठी ग्रामपंचायत प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने गावाचा कारभार वाऱ्यावर सोडल्याचे चित्र आहे.

# अर्धापूर नगरपंचायतच्या स्वीकृत सदस्याची आज निवड

■ धक्कादायक निवड निवडी कडे जनतेचे लक्ष




अर्धापूर : (स. गांवकरी)

नगरपंचायतीच्या स्वीकृत सदस्यांची निवड करण्यासाठी विशेष बैठक दि.२२ शुक्रवारी नगरपंचायत सभागृहात बोलविण्यात आली आहे. अर्धापूर नगरपंचायतीच्या स्वीकृत सदस्य निवडीसाठी निवडणूक पिठासीन अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. नगरपंचायत निवडणूक होऊन साडे चार वर्षे झाले असून नगरपंचायतीमध्ये शहर विकास आघाडीचे १३, एमआयएमचे तीन, राष्ट्रवादी एक असे पक्षीय बलाबल असल्याने सत्ताधारी शहरी विकास आघाडीचे दोन स्वीकृत सदस्य निवडले जाणार आहेत. स्वीकृत सदस्य निवडीचे सर्वाधिकार माजी मुख्यमंत्री,खा. अशोकराव चव्हाण व आ.श्रीजय चव्हाण यांच्याकडे असल्याने ते कोणत्या नावाला संमती देतील याकडे अर्धापूर शहरातील जनतेचे लक्ष लागले आहे. स्वीकृत सदस्यांची निवड अनेकांना धक्का देत नवीन चेहऱ्यांना संधी मिळणार की पुन्हा जुन्नांना संधी मिळणार याकडे शहरातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# बैतुलमाल कमेटीच्या वतीने सामूहिक विवाह सोहळा संपन्न




भोकर: (स. गांवकरी)

भोकर येथील बैतुलमाल कमेटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम समाजाच्या सामूहिक विवाह मेळाव्यात ११ जोडपी विवाहबद्ध झाली. समाजातील गरजू आणि कष्टकरी कुटुंबांना आधार देणारा हा उपक्रम उत्साहात आणि धार्मिक वातावरणात पार पडला.

बैतुलमाल कमेटीने गेल्या अनेक वर्षांपासून मुस्लिम समाजातील गरीब व कष्टकरी कुटुंबांतील मुला-मुलींच्या सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्याची परंपरा जपली आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा सोहळा मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला. शहरातील बटाळा रोडवरील रॉयल गार्डन येथे दि. २० मे रोजी सकाळी १० वाजता हा सामूहिक विवाह सोहळा मौलाना मुफ्ती ईमरान यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या सोहळ्यात ११ जोडपी विवाहबंधनात अडकली. विवाहाची धार्मिक प्रक्रिया काजी मुफ्ती मुजिबोद्दीन व काजी मुजीब यांनी पूर्ण केली. यावेळी नवविवाहित वधू-वरांना बैतुलमाल कमेटीच्या वतीने पवित्र धर्मग्रंथ कुराण शरीफ, गादी-पलंग, कपाट, पाच जोड कपडे, कुलर तसेच संसारोपयोगी भांडी व इतर आवश्यक साहित्य भेटस्वरूप देण्यात आले. समाजोपयोगी आणि गरजू कुटुंबांना दिलासा देणाऱ्या बैतुलमाल कमेटीच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कमेटीच्या पदाधिकाऱ्यांसह स्वयंसेवक आणि युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# “खतांसाठी बळीराजाचा एल्गार !”

## रासायनिक खतांचा तुटवडा दूर करा; अन्यथा देगलूर बंद — शिवसेना (ठाकरे)चा इशारा

देगलूर : (स. गांवकरी)




खरीप हंगाम तोंडावर आलेला असताना डीएपी, युरिया आदी रासायनिक खतांचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. शासनाने तातडीने खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा देत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सोमवार दि. २५ मे रोजी देगलूर येथील कृषी सेवा केंद्रे तसेच मोंढा बाजारातील आडत दुकाने बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. खरीप हंगामासाठी सोयाबीन, मुग, उडीद, कापूस आदी पिकांच्या पेरण्या जवळ आल्या असून शेतकऱ्यांना डीएपी, युरिया यांसारख्या खतांची अत्यंत आवश्यकता आहे. मात्र तालुक्यात खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना तेलंगणा, आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्यांमध्ये जाऊन जादा दराने खते खरेदी करावी लागत असल्याचा आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. प्रचंड उन्हात शेतीची कामे बाजूला ठेवून खतांसाठी भटकंती करावी लागत असल्याने शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. “शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू” अशी घोषणा करणाऱ्या शासनाच्या काळात अन्नदाता बळीराजाला साधी खतेही उपलब्ध होत नसल्याची खंत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी, पोलिस निरीक्षक, आडत व्यापारी संघटना तसेच कृषी सेवा केंद्र संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने हे निवेदन सादर करून त्वरित खतांचा मुबलक पुरवठा करण्याची मागणी केली.

यावेळी माजी उपजिल्हाप्रमुख तथा माजी जिल्हा परिषद सदस्य नागनाथ वाडेकर, शिवसेना शहरप्रमुख भगवान जाधव, बाबुराव मिनकीकर, युवासेना तालुकाप्रमुख तथा सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, विनोद सोनकांबळे, संतोष कांबळे, सय्यद मिरभाई, गंगाधर पाटील चाकूरकर, राजू उल्लेवार, हणमंत राजुरे लख्खेकर, संजय पाटील लख्खेकर, दत्तात्रय बेंजलवार, शिवाजी चव्हाण, शिवाजी पाटील ढोसणीकर, गंगाधर वकंलवार, अर्जुन लुटे, राजू जाधव तडखेलतांडा, अजित पाटील पाळेकर, संजीव मंगरुळे, सिद्धेश्वर आयनेलवार, सायबू विभुते यांच्यासह शिवसैनिक, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, सोमवारच्या बंद आंदोलनाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून खतांच्या प्रश्नावर आता शेतकरी अधिक आक्रमक होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# स्वीकृत सदस्यपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे श्याम पाटील व शंकर वट्टमवार यांची निवड

- ■ बारा वर्षांनंतर वट्टमवार यांची पुन्हा इन्ट्री
- ■ पवार काका -पुतण्या एकत्रित
- ■ पाच पवार पहिल्यांदाच सभागृहात



लोहा : (स. गांवकरी)

लोहा नगर परिषदेच्या दोन स्वीकृत सदस्यांची पीठासीन अधिकारी नगराध्यक्ष शरद पवार व सहाय्यक म्हणून मुख्याधिकारी संदीप भोळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्याम पाटील पवार व माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार याचे पुतणे शंकर वट्टमवार यांची बिनविरोध निवड झाली.पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी या निवडणुकीत आ चिखलीकर यांनी दिलेला शब्द पाळला तसेच कार्यकर्त्यांना न्याय मिळाला . नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक यांनी सहकार्य मिळाले असे सांगितले लोहा नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य निवडीसाठी २१ मे गुरुवारी सकाळी अकरा वाजता पीठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली नगरसेवकाची विशेष बैठक पार पडली. सहाय्यक म्हणून मुख्याधिकारी संदिप भोळे, होते निवडीसाठी नगररचना अभियंता कृष्णा कठारे , अजिंक्य केंद्रे, सुतार, यांनी सहकार्य केले

खरेदी विक्री संघाचे माजी उपसभापती श्याम पाटील पवार व माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार याचे पुतणे शंकर वट्टमवार यांची निवड करण्यात आली.सभागृहात आर्य वैश्य समाजाला प्रतिनिधित्व देऊ असा शब्द निवडणूक काळात आ प्रताप पाटील यांनी या समाजाच्या बैठकीत दिला होता त्याची पूर्तता करण्यात आली .तर नगराध्यक्ष शरद पवार यांचे धाकटे काका श्याम पाटील यांनीही प्रभाग नऊ मध्ये निवडणूक काळात उमेदवारी मागे घेताना शब्द दिला होता तो पाळण्यात आला असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी सांगितले.

निवड झाल्या नंतर दोन्ही नवनियुक्त सदस्य श्याम पाटील व शंकर वट्टमवार याचा प्रवीण पाटील यांनी सत्कार केला नगराध्यक्ष शरद पवार, युवा नेते सचिन पाटील चिखलीकर ,उपनगराध्यक्ष करीमशेख, माजी उपनगराध्यक्ष केशव मुकदम , नगरसेवक हरिभाऊ चव्हाण गटनेते भास्कर पवार यासह सर्व नगरसेवक ,पदाधिकारी उपस्थितीत होते.

लोह्याचे माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार हे आ चिखलीकर याचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत त्यांना स्वीकृत सदस्य म्हणून सभागृहात जाण्याची विचारणा केली पण त्यांनी नकार देत पुतण्या शंकर वट्टमवार यांची शिफारस केली .व त्याची निवड झाली २०१३ नंतर सभागृहात वट्टमवार परिवाराची इन्ट्री झाली .तर दुसरीकडे नगराध्यक्ष शरद पवार यांचे धाकटे काका श्याम पाटील यांची निवड झाली .न प निवडणूकीत अख्ख कुटुंब एकजूट झाले हिते २०१९ मध्ये या दोन्ही काका पुतण्यात लढत झाली होती पण पुतण्याने काकांचे नाव सुचविले व नगरसेवक केले तर दुसरीकडे काका यांनी पुतण्याची शिफारस केली व शंकर नगरसेवक झाला. सभागृहात पवारांची संख्या आता पाच झाली आहे.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)


आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,
आनंदगड शैक्षणिक संकुल
आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर
२५
वर्ष १९९९-२०२४
पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!
(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)
DTE Code 5480
मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी
डी फार्मसी
पात्रता १२ वी पास (PCB / PCM)
कालावधी २ वर्ष
प्र.क्षमता ६० विद्यार्थी
बी फार्मसी
पात्रता १२ वी पास (PCB / PCM & CET)
कालावधी ४ वर्ष
प्र.क्षमता ६० विद्यार्थी
विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!
- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321
ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा
धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज
के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)
अत्यल्प फी सर्वोत्कृष्ठ शिक्षण
आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा
- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670
आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved
सिव्हिल इंजिनिअरिंग 60
मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
इलेक्ट्रिकल ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस ॲण्ड मशीन लर्निंग 60
DTE Code 05662
- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -
Anandgad Virgaon
मातोश्री गंगुबाई शिंदे ॲक्यूपंक्चर कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल
डिप्लोमा इन ॲक्युपंक्चर थेरपी (DAT)
प्रवेश क्षमता ५० विद्यार्थी
डिप्लोमा कालावधी २ वर्षे
शैक्षणिक पात्रता इ. १२ वी पास
सुविधा
सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व ॲक्युपंक्चरिस्ट
ॲक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
वसतिगृह सुविधा उपलब्ध
- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045

# थोडक्यात पण महत्वाचे



## मार्केटला लागलेल्या भीषण आगीत २ कर्मचाऱ्यांचा मृत्यू तर २ जखमी

ठाणे (स. गांवकरी) : आज ३:४३ वाजताच्या सुमारास गावदेवी भाजी मार्केट इमारत, गोखले रोड, नौपाडा, ठाणे, (प.) या ठिकाणी गावदेवी भाजी मार्केटमध्ये भीषण आग लागली होती सदर घटनास्थळी नगरसेवक संजय वाघुले, नौपाडा रक्षक प्रमुख किरण नाकती, अतिरिक्त आयुक्त रोडे, उपआयुक्त गोदेपुरे, दिनेश तायडे, श्रीमती. मिताली मॅडम, मुख्य अग्निशमन अधिकारी झळके, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी एस. वाय. तडवी, नौपाडा पोलीस कर्मचारी, महावितरण कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान ०५- फायर वाहनासह, ०३- जम्बो वॉटर टँकर, ०२- वॉटर टँकरसह, ४ -रेस्क्यू वाहनासह व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- पिकअप वाहनासह, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान -१ पिकअप वाहनासह, ठा.म.पा. रुग्णवाहिका -३, १०८ रुग्णवाहिका, खाजगी वॉटर टँकर उपस्थित होते. सदर घटनेत दोन जखमी १) श्री. सुजित पष्टे (पु/ वय ४५ वर्षे, ठा. म. पा. अग्निशमन केंद्र, स्थानक अधिकारी ) २) श्री. समीर जाधव (पु/ वय ४० वर्षे, ठा. म. पा. अग्निशमन केंद्र, तांडेल तर सदर घटनेमध्ये १) श्री. काळू शंकर गाडेकर (पु/ वय-५३ वर्षे, ठाणे महानगरपालिका, आरक्षक) २) श्री सागर शिंदे. ( पु/ वय ४३ वर्षे, ठा. म. पा. अग्निशमन केंद्र, स्थानक अधिकारी) मृत्यूमुखी पडले.



## मंडप वाल्याच्या मुलीची झाली पोलीस दलात निवड

राहुरी (स. गांवकरी) : राहुरी येथील मंडप व्यवसायिक पेंटर सोनार मंडपवाले म्हणून प्रसिद्ध असलेले श्री.अर्जुन गजानन बुऱ्हाडे यांची मुलगी कु.वृषाली बुऱ्हाडे हिचे महाराष्ट्र पोलीस दलाच्या पुणे शहर चालक व सोबतच मुंबई शहर पोलीस अशा दोन्ही ठिकाणी एकाच वेळेस निवड झाल्याबद्दल शहरातील विद्यामंदिर प्रशाला येथे सत्कार सोहळा आयोजित केला होता. तत्पूर्वी शहरातील शनी मंदिर ते कार्यक्रम स्थळापर्यंत वृषालीची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा उषाताई तनपुरे- माजी नगराध्यक्ष राहुरी या होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून कर्मवीर अकॅडमी चे संस्थापक अध्यक्ष मेजर राजेंद्र कडू पाटील होते. तसेच राहुरी शहराचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर,जामखेड नगराध्यक्ष सौ पुनम चिंतामणी, विद्या मंदिर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. कैलास अनाप सर, सुजाताई अरुणसाहेब तनपुरे, हर्ष तनपुरे, राहुरी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष श्री गजानन सातभाई, नगरसेवक डॉ. संतोष उदावंत, राहुरीचे माजी नगरसेवक किशोर जाधव सर, सुवर्णकार समाज राहुरीचे अध्यक्ष बंडूशेठ उदावंत, बाबळेश्वरचे उपसरपंच राहुल डहाळे मंचावर उपस्थित होते. प्रस्तावना मंगेश बुऱ्हाडे यांनी केली. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिरूभाऊ सहदेव यांनी केले. शेवटी आभार अंजली नागरे यांनी मांनले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने समाज बांधव, मित्रमंडळी,पाहुणे उपस्थित होते. राहुरी तालुका मंडप असोसिएशन, राहुरी तालुका सुवर्णकार समाज, सर्व नगरसेवक यांच्याकडून वृषाली चा सत्कार करण्यात आला. सर्व मान्यवरांसह श्री रवींद्र घनवट यांनी वृषालीला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमानंतर अल्पोपहाराचे नियोजन करण्यात आले होते.

## इंदिरा गांधी पॉलिटेक्निक बेलवंडी शुगर येथे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रवेश प्रक्रिया केंद्र म्हणून इंदिरा गांधी पॉलिटेक्निक, बेलवंडी शुगर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष पॉलिटेक्निक ऑनलाईन प्रवेश सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने ही सुविधा दिनांक २० मेपासून सुरू झाली असून विद्यार्थ्यांनी २२ जूनपर्यंत ऑनलाईन नोंदणी व कागदपत्र पडताळणी पूर्ण करावी, अशी माहिती प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली. संस्थेमध्ये अद्ययावत संगणकीय प्रयोगशाळा, उच्च क्षमतेची इंटरनेट सुविधा तसेच प्रशिक्षित व विद्यार्थ्यांशी प्रभावी संवाद साधणारा प्राध्यापक वर्ग उपलब्ध असल्याने या केंद्राची निवड करण्यात आली आहे. डॉ. भोईटे यांनी सांगितले की, भारतीय नागरिकत्व असलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षेतील गुणांच्या आधारे प्रवेश दिला जाणार आहे. दहावीचे निकाल जाहीर झाले असले तरी विद्यार्थ्यांकडे मूळ गुणपत्रिका उपलब्ध नसल्याने ऑनलाईन नोंदणीसाठी फक्त बोर्डाकडून प्राप्त आसन क्रमांक किंवा ऑनलाईन मार्कशीटची प्रत देणे आवश्यक राहणार आहे. विद्यार्थ्यांचे गुण सॉफ्टवेअरद्वारे आपोआप ऑनलाईन अर्जात नोंदवले जाणार आहेत. हा नियम सीबीएसई मंडळाच्या विद्यार्थ्यांनाही लागू राहणार आहे.




ठाणे : दिव्यातील साबेगावची आई गावदेवी चिचूआईचा ३ रा वर्धापनदिन सोहळा मोठया उत्साहात संपन्न झाला. देवीची महापूजा, अभिषेक व महाआरती व सायं ४.३० ते ९ वा. - आईचा पालखी सोहळा रात्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी साबे ग्रामस्थ मंडळाच्या वतीने सर्वांना आमंत्रीत करण्यात आले होते. (फोटो - संतोष पडवळ)

# महंत श्री उद्धवजी महाराजांच्या हस्ते कलशारोहन

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा बुद्रुक परिसरातील एस कॉर्नर जवळील जोगेश्वरी वस्तीमध्ये लोक वर्गणीतून उभारण्यात आलेल्या जोगेश्वरी माता व श्री कालभैरवनाथांच्या मंदिरावर सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर यांच्या हस्ते व संतांच्या उपस्थितीत वेदमंत्राच्या जयघोषात कलशारोहन करण्यात आले. यावेळी झालेल्या कलशारोहन कार्यक्रम प्रसंगी महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक,विजय महाराज पवार,ज्ञानेश्वर महाराज पेचे यांच्या आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी करत त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी लोकवर्गणीतून बांधण्यात आलेल्या पुरातन व जागृत असलेल्या जोगेश्वरी माता व श्री कालभैरवनाथ मंदिरावर वेदमंत्राच्या जयघोष करत कळसाचे पूजन करण्यात येऊन कलशारोहन करण्यात आले. यावेळी झालेल्या कलशारोहन कार्यक्रम प्रसंगी महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक यांचे संतपूजन उपसरपंच बाळकृष्ण जायगुडे,गोकुळनाना जायगुडे, रामचंद्र जायगुडे व जोगेश्वरी तरुण मंडळाच्या वतीने करण्यात आले.हभप विजय महाराज पवार, ज्ञानेश्वर महाराज पेचे,मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयनदादा गडाख, माजी सरपंच प्रकाश सोनटक्के, अण्णाभाऊ पेचे,भानुदास रेडे,गोकुळ गावडे यांनी कलशारोहन कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.लोक वर्गणीतून बांधण्यात आलेल्या जोगेश्वरी माता मंदिर निर्माण कार्यासाठी परिसरातील लहान मोठ्यांनी खारीचा वाटा उचलून योगदान दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. यावेळी झालेल्या प्रवचन सोहळयात बोलतांना हभप उद्धवजी महाराज मंडलिक नेवासेकर म्हणाले की झालेल्या सागर मंथनात निघालेल्या अमृताचे रक्षण करण्याची जबाबदारी भगवान विष्णूंनी जोगेश्वरी मातेसह श्री कालभैरवनाथांना दिली होती हे दोन्ही स्थान येथे आहे हे क्षेत्र जागृत असे आहे,पूजा व उपासनेतून आपण सगुण असलेल्या परमात्म्याला पूजतो त्याचे चैतन्य आहे म्हणून आपण जीवंत आहोत नाहीतर हदय बंद पडले असते, ईश्वर डोळ्याने पहाता येत नाही मात्र तो दिसत नाही,त्याचे अस्थित्व असल्याचे त्यांनी प्रवचन प्रसंगी बोलतांना सांगितले. यावेळी जोगेश्वरी माता व श्री कालभैरवनाथांचे मंदिर जीर्णोद्धार करण्यासाठी हातभार लावणाऱ्या दात्यांचा यावेळी महंत श्री उद्धवजी महाराजांच्या हस्ते शाल श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी जोगेश्वरी माता जीर्णोद्धार कमिटीचे पदाधिकारी सदस्य,जोगेश्वरी तरुण मंडळाचे पदाधिकारी युवक कार्यकर्ते,नेवासा बुद्रुक पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते महाप्रसादाच्या वाटपाने कलशारोहन सोहळा कार्यक्रमाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर बाबासाहेब डौले यांनी उपस्थित भाविकांचे आभार मानले.सोहळा यशस्वीतेसाठी जोगेश्वरी तरुण मंडळाने विशेष प्रयत्न केले.





# विहिरीचा कठडा कोसळून 30 वर्षीय तरुणाचा मृत्यू

- मोहपाडा येथील रविंद्र भोये यांचा दुर्दैवी अंत
- अभोणा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद

कनाशी : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यातील ति-हळ बुद्रुक शिवारात शेतातील नव्याने बांधलेल्या विहिरीचा कठडा अचानक कोसळल्याने त्याखाली दबून 30 वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या प्रकरणी अभोणा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत तरुणाचे नाव रविंद्र गणेश भोये, वय 30 वर्षे, रा. मोहपाडा, ता. कळवण, जि. नाशिक असे आहे. दि. 21 मे 2026 रोजी सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास रविंद्र हा ति-हळ बुद्रुक शिवारातील गट नं. 111 येथील शेतात गेला होता. शेतात नव्याने बांधकाम झालेल्या विहिरीच्या कठड्यावर उभा राहून तो मोटारीने पाणी मारत होता. त्याचवेळी अचानक विहिरीचा कठडा तुटून खचला. रविंद्र तोल जाऊन थेट विहिरीत पडला व त्याचवेळी बाजूचा मलबा व दगड-माती त्याच्या अंगावर कोसळली. मलब्याखाली दबल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मयत रविंद्र याचे आजोबा नामदेव गोविंद बागुल, वय 65, रा. ति-हळ यांनी अभोणा पोलीस ठाण्यात दिली. त्यांनी दिलेल्या खबरीनुसार, नातू रविंद्र विहिरीत पडून मलब्याखाली दबून मयत झाल्याचे समजले. त्यानंतर खबर मिळताच अभोणा पोलीस ठाण्याचे सपोनि योगिता कोकाटे यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. स्थानिकांच्या मदतीने मलबा बाजूला करून मृतदेह बाहेर काढण्यात आला.

# चिखलीत रंगला ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

चिखली येथे रामदास झेंडे मित्रमंडळाच्या वतीने माता लिलाबाई झेंडे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध जाती-धर्मातील १६३ ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. आयुष्यभर संघर्ष करून कुटुंब उभे करणाऱ्या माता लिलाबाई झेंडे यांच्या कार्याला अभिवादन करत हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस, सोपानराव मुळे यांच्यासह अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. पांडुरंग क्षीरसागर महाराज, बाळासाहेब नाहाटा आणि राजेंद्र म्हस्के यांच्या हस्ते ज्येष्ठांचा गौरव करण्यात आला. माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गा तांबे तसेच ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मणराव ढोबळे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटीलकाका महाराज होते. यावेळी बोलताना त्यांनी, "मुले शिक्षणासाठी व नोकरीसाठी परदेशात जात असल्याने अनेक वृद्धांना वृद्धाश्रमाचा आधार घ्यावा लागतो. रामदास झेंडे मित्रमंडळाने ज्येष्ठांचा सन्मान करून आदर्श निर्माण केला असून प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांप्रती प्रेम व कर्तव्य जपले पाहिजे," असे सांगितले. माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस म्हणाले, "चिखलीकरांनी माझ्या राजकीय वाटचालीत नेहमीच साथ दिली. राजकीय संन्यासानंतर याच भूमीत माझा झालेला सन्मान माझ्यासाठी विशेष आहे." रामदास झेंडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, "वडिलांचे छत्र लवकर हरपल्यानंतर आईने काळ्या मातीत घाम गाळून आम्हाला चांगले दिवस दाखविले. त्याच प्रेरणेतून ज्येष्ठांचा सन्मान करण्याचा उपक्रम हाती घेतला." यावेळी बाळासाहेब नाहाटा, राजेंद्र म्हस्के, दिनकर पंधरकर, सोपानराव मुळे, पुरुषोत्तम लगड, नवनाथ बोडखे, संजय धामणे, संतोष पंधरकर, पोपटराव पवार आणि राणी झेंडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आनंदाश्रम स्वामी व रामेश्वर तरुण मंडळाने विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले, तर आभार रमेश झेंडे यांनी मानले.



# नारायणगाव-वाशी एसटी सेवा बंद

## २० ते २५ गावांतील नागरिकांची गैरसोय, बस सेवा पूर्ववत सुरू करण्याची मागणी!

नारायणगाव : (स. गांवकरी)

नारायणगाव ते वाशी ही एसटी बस सेवा गेल्या एक ते दीड वर्षांपासून रस्त्याच्या कामामुळे बंद करण्यात आली होती. मात्र आता रस्त्याचे काम पूर्ण होऊन इतर बस सेवा पूर्ववत सुरू झाल्यानंतरही नारायणगाव-वाशी बस सेवा अद्याप सुरू करण्यात आलेली नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. नारायणगाव ते येणेरे परिसरातील जवळपास २० ते २५ गावांतील हजारो नागरिक रोजगारासाठी नवी मुंबई परिसरात वास्तव्यास आहेत. विशेषतः एपीएमसी मार्केटमध्ये काम करणारे अनेक कष्टकरी या भागातील आहेत. गरीब, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच आजारी व्यक्तींसाठी ही बस सेवा महत्त्वाचा आधार होती. बस सेवा बंद झाल्यापासून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पूर्वी वाशीहून थेट गावाकडे जाता येत होते. मात्र आता प्रवाशांना कल्याणपर्यंत जाऊन दुसरी बस पकडावी लागत असून काहीवेळा बस सेवा विठ्ठलवाडीपर्यंतच मर्यादित राहत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. उन्हाळा, पावसाळा किंवा थंडी अशा कोणत्याही परिस्थितीत हातात सामान, सोबत लहान मुले किंवा आजारी नातेवाईक घेऊन प्रवास करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. लग्नसराई, कौटुंबिक कार्यक्रम किंवा अन्य कारणांसाठी गावाकडे जाणे अनेकांसाठी जिकिरीचे बनले आहे. स्थानिक ग्रामपंचायती, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन नारायणगाव एसटी डेपो प्रशासनाकडे पाठपुरावा करावा तसेच नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीने नारायणगाव-वाशी बस सेवा तातडीने पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. गरीब आणि सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.




# नयना वाळके यांना उत्कृष्ट मराठी अध्यापक पुरस्कार




श्रीगोंदा तालुका: (स. गांवकरी)

टाकळीभान (ता. श्रीरामपूर) येथील ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने प्रदान करण्यात येणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट मराठी अध्यापक पुरस्कार श्रीगोंदा येथील शारदा विद्या निकेतनच्या मुरलीधर (आण्णा) होनराव माध्यमिक विद्यालयातील मराठी विषयाच्या शिक्षिका नयना वाळके यांना प्रदान करण्यात आला.

टाकळीभान येथे आयोजित चौथ्या मराठी ग्रामीण साहित्य संमेलनात संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत यांच्या हस्ते वाळके यांना हा पुरस्कार देण्यात आला.

या पुरस्काराबद्दल संस्था अध्यक्ष प्रा. दिपक होनराव, उपाध्यक्ष एकनाथ आळेकर, संस्था सचिव डॉ. अशोक खेंडके, खजिनदार प्रा. ज्ञानदेव गायकवाड, संस्था विश्वस्त अशोक होनराव, लालासाहेब फाळके, राजेंद्र गुळवे, प्रा. डॉ. बाळासाहेब बळे, प्राचार्य बी. टी. मखरे, मुख्याध्यापिका संगीता वनपुरे, महाविद्यालय विभाग प्रमुख प्रा. कांचनताई कुरुमकर तसेच तांदळेश्वर माध्यमिक विद्यालय, तांदळीचे मुख्याध्यापक देवराम दरेकर आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

# गुरुचरित्र पारायण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न!

ओतूर : (स. गांवकरी)

डुंबरवाडी येथील श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिर संचलित ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा समिती यांच्या वतीने दिनांक २१ मे २०२६ रोजी गुरुपुष्यामृत योग तसेच अधिक मासानिमित्त गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पारायण सोहळ्यात जवळपास अडीचशे ते पावणे तीनशे वाचक व साधकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी नित्यनेमाप्रमाणे श्री स्वामी समर्थांच्या आरतीने झाली. सकाळी साडेसात वाजता आरती संपन्न झाल्यानंतर सकाळी आठ वाजता गुरुचरित्र पारायणास प्रारंभ करण्यात आला. दिवसभर भक्तिमय वातावरणात पारायण सुरू राहिले आणि सायंकाळी ६ वाजून १५ मिनिटांनी संपूर्ण गुरुचरित्र वाचन पूर्ण झाले. या कार्यक्रमासाठी साधक, भाविक, नातेवाईक तसेच परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्येष्ठ समाजसेवक व दानशूर व्यक्तिमत्त्व आदरणीय नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, डुंबरवाडी गावच्या सरपंच सौ. शितलताई गोरे, तसेच वारकरी संप्रदायातील विविध मठांचे मठाधिपती, ह.भ.प. शितोळे महाराज आणि ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली. डुंबरवाडी, खामुंडी, गायमुखवाडी, आळेफाटा, उदापूर, ओतूर, शिरवली, जुन्नर आदी परिसरातील मोठ्या संख्येने साधक या पारायण सोहळ्यासाठी उपस्थित होते. विशेष म्हणजे, सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या अन्नदान व महाप्रसाद कार्यक्रमासाठी तब्बल दीड हजारांहून अधिक भाविकांनी उपस्थिती लावली. मोठ्या भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेत परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. श्री स्वामी समर्थ मंदिर सेवा समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी पारायण सोहळ्यासाठी अतिशय सुंदर आणि शिस्तबद्ध नियोजन केल्यामुळे हा भव्य कार्यक्रम अत्यंत मंगलमय वातावरणात यशस्वीरित्या पार पडला. भाविकांनीही सेवा समितीच्या सर्व सदस्यांचे मनापासून आभार मानत, "ही सर्व श्री स्वामी समर्थ महाराजांची कृपा आणि सेवा आहे," अशा भावना व्यक्त केल्या. एकदिवसीय गुरुचरित्र पारायण, भक्तिभाव, अन्नदान सेवा आणि भाविकांची मोठी उपस्थिती यामुळे डुंबरवाडी येथील हा सोहळा परिसरात विशेष आकर्षणाचा विषय ठरला.





## थोडक्यात पण महत्वाचे




### जि. प. प्रा. शाळा मांडवे खुर्दला शाळेला वॉटर कुलरची भेट

मांडवे खुर्द (स. गांवकरी) : फुले-शाहू-आंबेडकरी विचारसरणी जपणारे सामाजिक कार्यकर्ते बुद्धवासी प्रकाशभाऊ अंबु बागुल यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयुष्यमती रंजनाताई प्रकाश बागुल व आयु. रमेशभाऊ अंबु बागुल यांच्या वतीने मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा पुरस्कार प्राप्त जि.प.प्राथमिक शाळा मांडवे खुर्द येथील विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या शुद्ध व थंड पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी या उदात्त हेतूने तब्बल ₹४५,००० रुपये किमतीचे ८० लिटर क्षमतेचे व्होल्टास कंपनीचे वॉटर कुलर भेट देण्यात आले. या स्तुत्य उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ, थंड व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून, बागुल परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत शिक्षण क्षेत्राला दिलेले हे योगदान अत्यंत प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी गावच्या सरपंच कमलताई गागरे, यशवंत जाधव, धावळू बागुल, संतोष बागुल, गौतम बागुल, अनुराधा रोकडे, रंजना रोकडे, सीमा मोरे, रमेश बागुल, अरविंद बागुल, कैलास गागरे, मंगेश गागरे, शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब शिंगोटे, प्रीतम बर्वे मॅडम, शैलेजा पायमोडे मॅडम, मंगल झावरे मॅडम तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांच्या वतीने समस्त बागुल परिवाराचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. “समाजासाठी दिलेले दान हेच खरे पुण्यकार्य असते,” अशा शब्दांत बागुल परिवाराच्या दातृत्वाचे कौतुक करण्यात आले.

### जयंतीच्या वादातून जीवघेणा हल्ला; एक जखमी

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील दिग्रस येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीदरम्यान झालेल्या किरकोळ वादाचे दुसऱ्याच दिवशी रक्तरंजित रूपांतर झाले. दोन गावांतील तणाव मिटवण्यासाठी चिकाळा येथे गेलेल्या ग्रामस्थांवर काही युवकांनी जीवघेणा हल्ला केला. यावेळी निखील लक्ष्मण चौंडे याने शेख आखील शेख बाबू (वय २६) यांच्या पाठीवर धारदार चाकूने वार केल्याचा आरोप आहे. तसेच इतर ग्रामस्थांवर दगडफेक व मारहाण करण्यात आली. जखमींना उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी तामसा पोलिसांत गुन्हा रजि. नं. 85/2026 दाखल करण्यात आला असून BNS कलम 118(2), 189(2), 190 व 191(2) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक बालाजी नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

### दिव्याला पिनकोड मिळविण्यासाठी शैलेश पाटील यांचा पाठपुरावा



ठाणे (स. गांवकरी) : गेली अनेक वर्षापासून मागणी असलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. मुंब्रा व दिवा शहराचा पिनकोड पूर्वी सलग्न असल्याने अनेक अडचनींचा सामना करावा लागत असे पत्रव्यवहारासह अनेक महत्वाची कागदपत्रे व पार्सलसाठी मुंब्रा शहरावर अवलंबून रहावे लागत असे तसेच मुंब्रा व दिवा शहरे मिळून पिनकोड समाविष्ट असल्याने पत्रव्यवहार किंवा पोस्टाशी संबंधित कामासाठी मुंब्रा शहरात जावे लागत असे किंवा एखादे महत्वाचे पार्सल संबंधीत ठिकाणी पोहचण्यास फार उशीर होत असे परंतु दिवा शहराला स्वतंत्र पिनकोड मिळावा या मागणीसाठी शिवसेना दिवा उपशहरप्रमुख तथा नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी देखील २०२१ पासून पाठपुरावा करत होते. गेली ५/६ वर्षांपासून पाटील यांनी आपला लढा सुरु ठेवला होता. अखेर आज यांच्या मागणीला यश मिळाले आहे. आता मुंब्रा शहरासाठी 400612 पिन कोड असणार असून दिवा शहरासाठी नविन व स्वतंत्र 400611 हा पिनकोड असणार असल्याचे अधिकृत प्रशासनाकडून जाहिर करण्यात आले आहे. नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी स्वतः जनरल पोस्ट ऑफिस मुंबई, मुख्य पोस्ट ऑफिस दादर तसेच ठाणे मुख्य पोस्ट ऑफिस येथे पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला होता तसेच तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय पत्रव्यवहार केले होते. वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरासाठी स्वतंत्र पिनकोड असणे खूप गरजेचे होते त्या अनुषंगाने खासदार श्रीकांत शिंदे यांनी पाठपुरावा केला त्याचेच फळ म्हणजे आज दिवा शहरासाठी स्वतंत्र ४००६११ हा पिनकोड जाहीर होऊन त्याची अंमलबजावणीसाठी पुढील कार्यवाही सुरू झालेली आहे. अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाल्याबद्दल सर्व दिवेकर नागरिकांकडून तसेच सर्व लोकप्रतिनिधी व शिवसैनिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### श्री स्वामी समर्थ महाराज मंदिरात डॉ. विश्वासराव आरोटे यांचा सत्कार!

आळेफाटा : (स. गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील आळेफाटा येथील श्री स्वामी समर्थ महाराज मंदिरास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी भेट दिली. यावेळी मंदिर परिसरात त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. श्रीमती भुजबळ ताई यांच्या हस्ते डॉ. विश्वासराव आरोटे यांना शाल, पुष्पगुच्छ आणि श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


सामाजिक, पत्रकारिता आणि जनहिताच्या कार्यातून योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा प्रेरणादायी ठरत असल्याची भावना यावेळी उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.



# अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात संपन्न!

सांगली : (स. गांवकरी)

ता. जत, जि. सांगली येथे पूज्य प. पू. सिद्धेश्वर महास्वामीजी, विजयपूर आश्रम यांच्या प्रेरणेने बाबा आश्रम संख येथे लावण्यात आलेल्या वृक्षांच्या स्मरणदिनानिमित्त तसेच संत सयाजी बागाडेबाबा मंदिराच्या चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त दि. २१ मे २०२६ रोजी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.



या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला उपस्थित होते. यावेळी श्री सिद्धाया मोरे, श्री संजय दामोदर धुमाळ, श्री कृष्णा बिरादर, श्री विठ्ठलराव वरुडे, श्री कांतीलाल वरुडे, ह.भ.प. अमृत पाटील महाराज, ह.भ.प. दादा काटे महाराज, ह.भ.प. समर्थ संतोष महाराज, श्री रामदास भोसले, श्री लिवगोंडा भोसले, श्री चन्नाप्पा आवटी यांच्यासह संखा व गोंधळेवाडी परिसरातील ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच श्री संत सयाजी बागडेबाबा मानव मित्र संघटना महाराष्ट्र राज्य, विणेकरी मंडळ तसेच चिवकलगी मठाचे प्रतिनिधी देखील कार्यक्रमात सहभागी झाले होते.

समाजसेवक श्री नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या मनोगतात पर्यावरण संवर्धन, शिक्षण आणि व्यसनमुक्त समाज निर्मिती यावर विशेष भर दिला. पूज्य सिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या प्रेरणेने लावण्यात आलेली वृक्षसंपदा ही केवळ पर्यावरण रक्षणासाठी नसून भावी पिढीसाठी दिलेला प्रेरणादायी संदेश असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असून युवकांनी व्यसनांपासून दूर राहून चांगले विचार, संस्कार आणि समाजसेवा यांचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी विठ्ठलराव वरुडे यांनी नानजीभाई ठक्कर यांच्या समाजकार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी शिक्षण, आरोग्य आणि समाजसेवा क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया व आरोग्यसेवा मिळत असून त्यांच्या शैक्षणिक संस्थांमधून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विविध क्षेत्रांत अधिकारी, डॉक्टर, अभियंते आणि तज्ज्ञ घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी उभे केले आहे. कार्यक्रमाच्या शेवटी माननीय श्री नानजीभाई ठक्कर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. धार्मिक, सामाजिक आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

## क्लबवर छापा, रम्मी जुगार खेळताना तिघे रंगेहात ताब्यात

राहाता : (स. गांवकरी)

राहाता पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दिपक सरोदे यांनी अवैध व्यवसायांविरोधात धडाकेबाज मोहीम सुरू केली असून त्याअंतर्गत साकुरी येथील हॉटेल आठवण येथे सुरू असलेल्या कथित क्लबवर छापा टाकत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत रम्मी जुगार खेळताना तिघांना रंगेहात पकडण्यात आले. दि. १७ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी साकुरी येथील हॉटेल आठवण येथे धाड टाकली. यावेळी आरोपी दत्तात्रय सूर्यभान भोंगळ (रा. पिंपळस), किशोर विठ्ठल भंगणे (रा. राहाता) आणि संजय दत्तात्रय राऊत (रा. बेलापूर) हे विनापरवाना बेकायदेशीरपणे रम्मी जुगार खेळताना आणि खेळविताना आढळून आले. या छाप्यात पोलिसांनी आरोपींकडून ४१ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात रोख रक्कम, जुगारासाठी वापरलेले ५२ पत्ते तसेच १० हजार रुपये किमतीचा व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी राहाता पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजि. नं. १९५/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक दिपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका डी. के. अभंग आणि पोलिस पथकाने सहभाग घेतला. पुढील तपास पोहेका अभंग करीत आहेत. राहाता शहरात नुकतेच पदभार स्वीकारलेल्या पोलीस निरीक्षक सरोदे यांनी अवैध धंद्यांवर कारवाईचा बडगा उगारल्याने जुगार, मटका आणि इतर बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. दीर्घकाळापासून सुरू असलेल्या काही क्लबवर पोलिसांची नजर असून आगामी काळात आणखी मोठ्या कारवाया होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## जामखेड तालुक्यात अवैध सावकारी विरोधात मोठी कारवाई

जामखेड तालुका : (स. गांवकरी)

■ सहकार विभागाच्या एकाच वेळी तीन ठिकाणी धाडी!

“सहकार आणि पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने तीन ठिकाणी छापे टाकून महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत. सध्या या सर्व कागदपत्रांची सखोल पडताळणी व चौकशी सुरू आहे. सदर पडताळणीअंती पुढील आवश्यक ती कारवाई केली जाईल. नागरिकांनी आर्थिक गरजेसाठी शक्यतो राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, पतसंस्था अथवा परवाना धारक सावकार यांच्याकडूनच कर्ज घ्यावे.

— **दिलीप तिजोरे, सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक, जामखेड**

सहकार खाते.. पोलीस खाते. व सहकार खात्यातील वरिष्ठ अधिकारी यांनी संयुक्तपणे.. अत्यंत गुप्तेने ही कारवाई करण्यात आली आहे. यामुळे अवैध सावकारी जगत मधे दबदबा निर्माण झाला आहे.. त्यांना जरब बसली आहे.

अशा कारवाया कधितरी होण्या ऐवजी वारंवार झाल्या पाहिजेत. म्हणजे अवैध सावकाराचे कबंरडे मोडल्या शिवाय रहाणार नाही असि बोलकी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाची धडक कारवाई; तीन ठिकाणी छापे, आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आले आहेत. जामखेड तालुक्यात अवैध सावकारीच्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने पोलिस प्रशासनाच्या मदतीने मोठी धडक कारवाई केली. तालुक्यात एकाच वेळी 3 ठिकाणी छापे टाकत अवैध सावकारी करणाऱ्यां विरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या कारवाईत कोरे धनादेश, खरेदीखते तसेच इतर आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जामखेड तालुक्यात अवैध सावकारी सुरू असल्याबाबत प्रशासनाकडे आवश्यक कागदपत्र सह तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींच्या आधारे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, विभागीय निबंधक संभाजी निकम आणि जिल्हा निबंधक मंगेश सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निबंधक तथा सावकारांचे सहाय्यक निबंधक दिलीप तिजोरे यांनी जिल्ह्यातील विविध क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा समावेश करून, जामखेड चे पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या समन्वयाने विविध पथके तयार करून सदरची कारवाई केली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम 2014 च्या कलम 16 अन्वये ही कारवाई करण्यात आली. सहकार विभागाचे 16 अधिकारी-कर्मचारी आणि पोलिस दलाचे 6 अधिकारी-कर्मचारी अशा 22 जणांच्या संयुक्त पथकाने मंगळवारी दोन संशयित ठिकाणांवर छापे टाकले. अचानक झालेल्या या कारवाईमुळे अवैध सावकारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. छाप्या दरम्यान कोरे धनादेश (Blank Cheques), खरेदीखते (Sale Deeds) , आर्थिक नोंदी असलेल्या वह्या, तसेच इतर महत्त्वाचे दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत. या कागदपत्रांच्या आधारे पुढील तपास आणि चौकशी सुरू करण्यात आली आहे. सहकार विभागाने तालुक्यातील सर्व नागरिकांना अवैध सावकारी विरोधात सहाय्यक निबंधक कार्यालय, जामखेड येथे आवश्यक कागदपत्रासहा तक्रार दाखल केल्यास कठोर कारवाई केली जाईल असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## 'शिवनेरी हापूस'ची महाराष्ट्रातील आंबाप्रेमीची प्रतिक्षा संपणार

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

दरवर्षी मे महिना संपत आला आणि पावसाच्या सरी कोसळू लागल्या की,आंब्याचा हंगाम संपला अशी आंबाप्रेमींची धारणा असते.कोकण हापूसची बाजारातून एक्झिट सुरू झाली की आंबाप्रेमी काहीसे नाराज होतात.मात्र नेमक्या याच वेळी बाजारात एका अशा हापूसची दिमाखात प्रवेश होतो,ज्याचा हंगाम पावसाने संपत नाही तर चक्क पावसाने सुरू होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मभूमीचा आणि तब्बल दोन हजार वर्षांचा देदीप्यमान विशेष इतिहास आपल्या अंगाखांद्यावर मिरवणारा जुन्नर परिसरातील 'शिवनेरी हापूस'ला डिसेंबर २०२४ मध्ये केंद्र सरकारने जीआय टॅग प्रदान केला. या अधिकृत भौगोलिकमानांकनाची प्रतिक उमटवून जागतिक पातळीवर झळकण्यासाठी शिवनेरी हापूस आंबा सज्ज झाला आहे.



'साधारणपणे कोकणचा हापूस बाजारातून काढता पाय घेतो, त्याच वेळी जुन्नरचा आंबा मुंबई बाजारपेठेत दिमाखात प्रवेश घेतो. साधारणपणे ५०० एकर परिसरात या आंब्याची लागवड केली जात असून या भागातून दरवर्षी दीड ते दोन हजार टन इतके दर्जेदार उत्पादन होते. येथील आंचा प्रामुख्याने मुंबई आणि पुण्याच्या बाजारात जाती आणि त्याला ग्राहकांची मोठी पसंती मिळते, असे माजी सनदी अधिकारी आणि शिवनेरी हापूस उत्पादक अभिमन्यू काळे यांनी ""दैनिक समर्थ गावकरीशी"" बोलताना सांगितले.

या आंब्याला तब्बल २ हजार वर्षांची ऐतिहासिक परंपरा आहे इसवी सन पूर्व २०० च्या आस पासच्या 'गाथासप्तशती' या प्राचीन ग्रंथात जुन्नरच्या आंब्या चा पहिला गौरवशाली उल्लेख आढळतो.पुढे निजामशाहीचा वजीर मलिक अंबर याने येथे लावलेली बाग आज ३५० वर्षांनंतरही 'हाफीज बाग' म्हणून जिवंत इतिहास सांगत उभी आहे.

भौगोलिकदृष्ट्या हा आंबा जुन्नर तालुक्याच्या पश्चिम भागा तील येनेरे,तांबे,काले,दारखीळ वाडी,पारुंडे,वैष्णवधाम,कुसुर निरगुडे,बोतार्डे,शिंदे राळेगण, खामगाव,माणिकडोह,बेलसर, चिंचोली,वडज,सुराले,वानेवाडी धालेवाडी,गोद्र,काटेडे,तेजुर, पूर,शिरोली आणि कुकडेश्वर.


शिवनेरी हापूसचा डीएनए हा रत्नागिरी किंवा देवगडच्या हापूसपेक्षा वैज्ञानिकदृष्ट्या पूर्णतः वेगळा असल्याचे सिद्ध झाले आहे. कोकणातील लाल माती आणि खारे वारे यापेक्षा उलट,जुन्नरची काळी माती, कोरडी हवा आणि मुबलक पाऊस या भौगोलिक परिस्थिती मुळे या आंब्याला एक वेगळी घनता,कमालीचा घट्टपणा आणि अनोखा गोडवा प्राप्त होतो. या आंब्यातील प्रोटीन्स, कार्बोहायड्रेट्स,कॅल्शियम आणि पोटॅशियमचे प्रमाणही वेगळे असून,'जीआय' प्रक्रिये दरम्यान येथील ११५ वर्षे जुन्या झाडांची शास्त्रीय पद्धतीने तपासणी हे याचे सर्वात मोठे पुरावे ठरले आहेत.

जुन्नर तालुक्यातील बुचकेवाडी येथील प्रयोगशील शेतकरी भरत जाधव यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या मदतीने हा संकरित वाण विकसित केला आहे. या वाणाला केंद्र शासनाची अधिकृत मान्यता मिळाली आहे.वैशिष्ट्ये: या आंब्याचे वजन ८०० ते १००० ग्रॅमपर्यंत असते. यात हापूस आणि केशरचा स्वाद असून,आकार राजापुरी सारखा मोठा असतो. उत्पादन: हे उत्पादन पूर्णपणे सेंद्रिय (सेंद्रिय) पद्धतीने घेतले जाते.

## ठाणे पालिकेकडून सिंगल यूज प्लास्टिक विरोधात कारवाई

ठाणे : (स. गांवकरी)

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सिंगल यूज प्लास्टिक (SUP) बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण विभागाकडून विशेष मोहीम राबविण्यात आली. दिनांक 01 एप्रिल 2026 ते 15 मे 2026 या कालावधीत प्रभाग समिती निहाय घनकचरा व्यवस्थापन विभाग, अतिक्रमण विभाग व प्रदूषण नियंत्रण विभागामार्फत संयुक्तरित्या करण्यात आलेल्या कारवाईत एकूण 157 आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून सुमारे 79 किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर रु. 80,500 इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आल्याचे मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी नमूद केले. याशिवाय हवा प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने स्वच्छ दक्षता समितीमार्फत 21 मे रोजी विविध बांधकाम स्थळांची पाहणी करण्यात आली. तसेच कळवा प्रभाग



समिती क्षेत्रातील हायवे लगत टाकण्यात आलेल्या राडारोड्याचीही तपासणी करण्यात आली असून संबंधित उपाययोजना सुचविण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. एकल वापर प्लास्टिक बंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजवणीच्या अनुषंगाने केंद्रीय व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दर महिन्यालाअंमलबजावणी मोहिम राबविण्याचे निर्देश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. तसेच तपासणीची संवेदनशीलता लक्षात घेवून, अनुचित घटना टाळण्यासाठी तपासणी पथकाला पोलीस संरक्षणासह सर्व प्रशासकीय मदतीचा समावेश करण्याची देखील सूचना केली आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेचा “शहापूर पॅटर्न” : शिक्षकांच्या अथक परिश्रमातून घडले यश

(स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी (PUP) व इयत्ता ८ वी (PSS) शिष्यवृत्ती परीक्षेच्या २०२६ च्या अंतरिम निकालामध्ये शहापूर तालुक्याने पुन्हा एकदा उल्लेखनीय यश संपादन करत राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. अत्यल्प साधनसामग्री, दुर्गम व आदिवासी भागातील शाळा आणि मर्यादित संसाधने असूनही शहापूर तालुक्याने “शिष्यवृत्ती परीक्षेचा शहापूर पॅटर्न” राज्यासमोर उभा केला आहे. इयत्ता ५ वीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (PUP) परीक्षेत शहापूर तालुक्यातील तब्बल २५६ विद्यार्थी पात्र ठरले असून ठाणे जिल्ह्यात सर्वाधिक यश संपादन केले आहे. तसेच इयत्ता ८ वीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (PSS) परीक्षेतही शहापूर तालुक्यातील ८ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. जिल्ह्यातील एकूण पात्र विद्यार्थ्यांमध्ये शहापूर तालुक्याचा सिंहाचा वाटा आहे. या यशामागे शिक्षकांचे नियोजन, सामाजिक संस्थांचे सहकार्य, पालकांचा विश्वास आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत हे महत्त्वाचे घटक ठरले आहेत.

शिष्यवृत्ती परीक्षेच्या अंतरिम निकालात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अस्नोलीने यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्ता परंपरा कायम राखली आहे. शाळेचे तब्बल ३० विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा एकदा ठसा उमटला आहे. शहापूर तालुक्यात शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अनेक सामाजिक संस्था, उपक्रमशील शिक्षक आणि शैक्षणिक संघटना एकत्र येऊन नियोजनबद्ध पद्धतीने कार्य करत आहेत.

### विद्यार्थ्यांच्या यशामागील मेहनत

जिया हलपतराव – जिल्हा परिषद शाळांमधून जिल्ह्यात प्रथम शेलवली बांगर जिल्हा परिषद शाळेची 8 वी वर्गातील विद्यार्थिनी जिया हलपतराव हिने मिशन भरारी, NMMS आणि शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला. ती सांगते, “आमच्या शाळेत जादा तासिका, शनिवार व रविवारी विशेष वर्ग, प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि आदर्श परिपाठ यांसारखे उपक्रम सातत्याने राबवले जातात. शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि नियोजनामुळे मला हे यश मिळाले.”

### गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रेरणादायी दिशा

शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षक डॉ. हरिश्चंद्र लक्ष्मण भोईर यांनी सांगितले, “शिष्यवृत्ती परीक्षा ही केवळ गुणांची स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता, सातत्य आणि आत्मविश्वासाची खरी चाचणी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन, नियमित सराव आणि पालक-शिक्षकांचे सहकार्य मिळाल्यास विद्यार्थी राज्यस्तरावरही यश मिळवू शकतात. शहापूर तालुक्याने केलेली प्रगती ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची प्रेरणादायी दिशा आहे.”

शिक्षकांना शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे, विद्यार्थ्यांचा गौरव करणे, अतिरिक्त वेळ देणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करणे तसेच सराव परीक्षांसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे अशी महत्त्वपूर्ण भूमिका ही संस्था बजावत आहे. श्री सत्यसाई सेवा संस्था तलवाडे-ठाणे, सेवा सहयोग संस्था, फॅन्ड्री फाउंडेशन यांसारख्या संस्थांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी आवश्यक मार्गदर्शक पुस्तके आणि प्रश्नसंच मोफत उपलब्ध करून दिले. जाणीव प्रतिष्ठान, दीपस्तंभ प्रतिष्ठान आणि स्व. काशिनाथ भोईर प्रतिष्ठान यांनी स्वतंत्रपणे शिष्यवृत्ती सराव परीक्षांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला. आदिवासी उन्नती मंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून तालुक्यातील निवडक विद्यार्थ्यांना दर रविवारी शहापूर येथे बोलावून तज्ज्ञ शिक्षकांकडून मोफत मार्गदर्शन दिले जाते. तालुक्यातील अनेक प्राथमिक शिक्षक या उपक्रमात विनामूल्य सेवा देतात. याशिवाय दरवर्षी यशस्वी विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिक देऊन गौरवही केला जातो. तालुक्यातील उपक्रमशील शिक्षकांनी एकत्र येत “ज्ञानकुंभ टीम” ची स्थापना केली.

या टीमने स्वतःची शिष्यवृत्ती मार्गदर्शक पुस्तके आणि प्रश्नसंच तयार केले. आदिवासी उन्नती मंडळ आणि जाणीव प्रतिष्ठान यांनी या पुस्तकांच्या छपाईचा संपूर्ण खर्च उचलून ती पुस्तके शहापूर तालुक्यातील सर्व शाळांमध्ये मोफत वितरित केली.

# थोडक्यात पण महत्वाचे

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात आरोपी गजाआड

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या गंभीर प्रकरणात पडघा पोलिसांनी आरोपी रोशन उर्फ नाना पवार (वय २२) याला आतकोली पाडा परिसरातून अटक केली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत भिवंडी जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे तालुक्यात महिला व बाल सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती. पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी पडघा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. आरोपी रोशन पवार याच्याविरुद्ध ‘लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा’ (पॉक्सो) तसेच भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी आपल्या घरी असल्याची गोपनीय माहिती पडघा पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने सापळा रचला. मध्यरात्रीच्या सुमारास आतकोली पाडा परिसरात छापा टाकून आरोपीला ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या तत्परतेची चर्चा सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीला भिवंडी जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी सरकारी पक्षाच्या वकिलांनी आरोपीकडून अधिक चौकशी करणे आवश्यक असल्याचा युक्तिवाद करत पोलीस कोठडीची मागणी केली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

## लाल किल्ल्यावर २४ मे रोजी होणार ‘जनजाती गर्जना रॅली’

किनवट (स. गांवकरी) : जनजाती आदिवासी समाजाच्या आरक्षण, सांस्कृतिक अस्मिता आणि धर्मांतराच्या मुद्द्यावर देशव्यापी जनजागृती करण्यासाठी जनजाती सुरक्षा मंच व देवगिरी कल्याण आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. २४ मे २०२६ रोजी दिल्ली येथील लाल किल्ला मैदानावर “जनजाती संस्कार समागम – गर्जना रॅली” आयोजित करण्यात आली आहे. या राष्ट्रीय स्तरावरील आंदोलनात सहभागी होण्यासाठी किनवट जिल्ह्यातून सुमारे १५०० प्रतिनिधी दिल्लीकडे रवाना होत असल्याची माहिती देवगिरी कल्याण आश्रमाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकाद्वारे दिली. देवगिरी कल्याण आश्रमाचे प्रांत उपाध्यक्ष डॉ. उत्तम धुमाळे, जिल्हाध्यक्ष तुकाराम भाऊराव पेंदोर, जिल्हा सचिव विश्वनाथ नखाते, प्रांत सदस्य प्रकाश टारपे यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली. जनजाती सुरक्षा मंचाच्या मते अनुसूचित जमातींसाठी असलेले आरक्षण हे संविधानाने सामाजिक न्यायासाठी दिलेले संरक्षण आहे. मात्र धर्मांतर करून मूळ आदिवासी परंपरा, श्रद्धा, रूढी व सांस्कृतिक ओळख सोडणाऱ्या व्यक्तींनी अनुसूचित जमातींच्या आरक्षणाचा लाभ घेऊ नये, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. “डिलिस्टिंग” या मागणीअंतर्गत धर्मांतरित व्यक्तींना अनुसूचित जमातीच्या यादीतून वगळण्यात यावे, अशी भूमिका मंचाने मांडली आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आदिवासी समाजाला भौगोलिक अंतर, सामाजिक-आर्थिक मागासलेपण, विशिष्ट संस्कृती, बोलीभाषा, परंपरा व रूढी यांच्या आधारावर संविधानिक संरक्षण देण्यात आले आहे. मात्र धर्मांतरामुळे मूळ सांस्कृतिक ओळख बदललेल्या व्यक्तींमुळे आदिवासी समाजाच्या हक्कांवर परिणाम होत असल्याचा आरोप त्यांनी केला.


## जयंतीच्या वादातून जीवघेणा हल्ला; एक जखमी

तामसा (स. गांवकरी) : हदगाव तालुक्यातील दिग्रस येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीदरम्यान झालेल्या किरकोळ वादाचे दुसऱ्याच दिवशी रक्तरंजित रूपांतर झाले. दोन गावांतील तणाव मिटवण्यासाठी चिकाळा येथे गेलेल्या ग्रामस्थांवर काही युवकांनी जीवघेणा हल्ला केला. यावेळी निखील लक्ष्मण चौंडे याने शेख आखील शेख बाबू (वय २६) यांच्या पाठीवर धारदार चाकूने वार केल्याचा आरोप आहे. तसेच इतर ग्रामस्थांवर दगडफेक व मारहाण करण्यात आली. जखमींना उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी तामसा पोलिसांत गुन्हा रजि. नं. 85/2026 दाखल करण्यात आला असून BNS कलम 118(2), 189(2), 190 व 191(2) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. पोलीस उपनिरीक्षक बालाजी नरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## 'विद्यापीठात' कला आणि संस्कृती उन्हाळी शिबिरा'चा थाटात समारोप


नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील 'विद्यार्थी विकास विभाग' आनी 'ललित व प्रयोगजीवी कला संकुल' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'कला आणि संस्कृती उन्हाळी शिबिर २०२६' चा समारोप समारंभ दि.२० मे, २०२६ रोजी अत्यंत उत्साहात संपन्न झाला. दि.५ ते २० मे या कालावधीत चाललेल्या या १५ दिवसीय शिबिराचा समारोप समारंभ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी शिबिरात सहभागी झालेल्या मुलांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू म्हणाले की, "अशा शिबिरांमुळे लहान मुलांच्या सुप्त कलागुणांना हक्काचे व्यासपीठ आणि वाव मिळतो. लहान वयातच मुलांनी वादन, संगीत व इतर कलांचे शिक्षण घेतले, तर भविष्यात ते उत्तम कलाकार म्हणून नावलौकिक मिळवतील." आपल्या मुलांमधील कलागुणांचा झालेला सकारात्मक विकास पाहून उपस्थित पालकांनीही विद्यापीठाच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

## बल्याणीत अनधिकृत बांधकामांवर सर्वात मोठी कारवाई



टिटवाळा (स. गांवकरी) : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या अनधिकृत बांधकाम विभागाने अ प्रभागातील बल्याणीत शुक्रवारी दिवसभर सर्वात मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल 280 च्या आसपास अनधिकृत खोल्या जमीनदोस्त करण्याबरोबरच 50 जोते निष्कासित करण्यात यश मिळवले आहे. बल्याणी परिसरातील धर्मशील मैदान,खजुरी नगर (एमआय) येथील अनधिकृत बांधकामाच्या अनेक तक्रारी दिवसेंदिवस वाढत होत्या. याप्रकरणाची गंभीर दाखल घेत आयुक्त अभिनव गोयल यांच्या आदेशानुसार अनधिकृत बांधकाम विभागाचे उपआयुक्त प्रसाद बोरकर,अनधिकृत बांधकाम सहाय्यक आयुक्त सुषमा मांडगे,अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे,अ प्रभागाचे सहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी,क प्रभागाचे सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात,ड प्रभागाचे सहाय्यक आयुक्त उमेश यमगार,फ प्रभागाचे सहाय्यक आयुक्त प्रसाद ठाकूर यांच्या सह पाचही प्रभागातील तब्बल 50 कर्मचारी,ठेकेदाराचे 50 कामगार,100 पोलीस अधिकारी कर्मचारी तसेच 4 जेसीबी 1 पोकलेन यांच्या सहाय्याने चोख बंदोबस्त ठेवत तब्बल 280 च्या आसपास अनधिकृत खोल्या जमीनदोस्त करण्यात यश मिळवले आहे. सायंकाळी 6 वाजेपर्यंत सदरची कारवाई सुरू असल्याची माहिती अ प्रभागाचे सहाय्यक आयुक्त जयवंत चौधरी यांनी माहिती दिली.

# अंतरी....एक काव्य प्रवास मनाचा




(स. गांवकरी)

अहिल्यानगर साहित्य क्षेत्राच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. येथील शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने याहीवर्षी १७ वे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन दि २३ आणि २५ मे रोजी अहिल्यानगरमध्ये संपन्न होत आहे. यानिमित्ताने माझी प्रिय मैत्रीण सुरेखा घोलप यांचा 'अंतरी' हा काव्यसंग्रह प्रकाशित होणार आहे. प्रकाशनापूर्वीच या पुस्तकाने अनेकांची मने जिंकली आहेत.म्हणूनच सहृदय कवयित्री सुरेखा घोलप यांचे खूप खूप अभिनंदन.

दाटून आलेल्या संध्याकाळी
अवचित सोनेरी ऊन पडतं
शब्दांचं आभाळ ही दाटून आलं की
कविते तुझ सुंदर शिल्प घडतं

असंच काहीसं सुरेखा ताईंच्या कवितेबाबत म्हणावं लागेल. हृदयातली असंख्य दुःखे दाबून धरूनही जेव्हा ओठावर आणि चेहऱ्यावर हसू असतं तेव्हा पाषाण हृदयालाही पाझर फुटत असतो. वैयक्तिक दुःख मनात दाबून सुरेखा ताईंनी आपले मन लेखनात गुंतवले इतकेच नाही तर स्वतःचे पुस्तक प्रकाशित करण्याआगोदर स्वतःच्या मुलगा छोट्या गौरवच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्याच्या 'गंपूच्या गोष्टी' हा कथासंग्रह प्राणपणाने कष्ट घेऊन प्रकाशित केला आणि तितकाच तो यशस्वी झाला.

आई म्हणजे जणू मंदिराची पायरी.. स्वतः कष्ट सोसून लेकाला जणू सरस्वतीचे दर्शन सुरेखा ताईंनी घडवून दिले. 'अंतरी' या त्यांच्या 51 कवितांच्या प्रथम कविता संग्रहात मनातील विविध भावभावनांची प्रतिबिंबे उमटविणाऱ्या कविता आपल्याला पाहायला मिळतात.

दगड पडला पाण्यात
प्रतिबिंबटच डचमळले
अन् तुषार झेलतमी
मलाच घेऊन निघाले

या त्यांच्या पहिल्याच कवितेत त्या मनातील वेदना व्यक्त करतात. माणसाच्या आयुष्यात दुःख हे तप्त उन्हाळ्याप्रमाणे असलं तरी आपल्याला गुलमोहोरासारखे फुलता यायला हवं हे त्यांच्या गुलमोहोर या कवितेतून त्या अगदी निर्भयपणे सांगतात.

त्याचं फुलणं बघून त्या त्याला प्रश्नही विचारतात हे प्रश्न उदास करत नाही तर माणसाच्या मनात नव चेतना निर्माण करतात. सुरेखाताई त्यांच्या कवितेत पुरोगामी विचारही ठिकठिकाणी पेरतात. त्यांच्या लेकी सावित्रीच्या या कवितेमध्ये वटसावित्रीच्या दिवशी सावित्रीच्या लेकी होऊ, फुल्यांची सावित्री आठवू असं त्या ठणकावून सांगतात. माणूस म्हणून जन्माला आल्यावर जास्त न बघायला मिळणारी गोष्ट म्हणजे माणुसकी, त्या आपल्या कवितेत सांगतात.

माणसांच्या वागण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा मध्ये माणुसकी कोठे आहे? असा प्रश्न त्या विचारतात. दुःखाने होरपळत असलेल्या या कवयित्रीच्या मनात प्रेमही तितकेच भरलेले आहे आणि हेच प्रेम त्या सख्या या कवितेत सख्या तुझे एकटक पाहणे अन् मी घट्ट पापण्या मिटवून घेणे इतके सवयीचे झाले. अशाप्रकारे व्यक्त करतात की कवितेच्या प्रेमात पडल्याशिवाय माणूस राहत नाही.

आपल्या झाड या कवितेतून त्या वाचकांच्या नजरेतही हिरवाईचे स्वप्न पेरतात. श्रावण या कवितेतून ही कवियत्री श्रावणासारखी फुलत राहते. आणि आठवणींचे उमाळे या कवितेतून आपल्यालाही आठवणींच्या जगात घेऊन जाते. मनाने संवेदनशील माणुसकीची जाण असणारी ही कवयित्री दुनियेत वावरताना आपली स्वतःची एक वेगळी नजर ठेवते आणि अंतरीची ही नजर तिच्या अनेक कवितांमधून आपल्याला स्पष्ट जाणवते. अंतरी हे नाव ही खूप भावस्पर्शी आहे.

मन, भावना, गूढता आणि अंतर्मनातील प्रवासाचा सुंदर संगम यात जाणवतो.अंतरी ही निःशब्द भावनांची भाषा आहे.

असे मला वाटते.अंतरातून ती बोलते आहे ,तिच्या शब्दांतून तिला क्रांती हवी आहे म्हणून हृदयांतरीच्या कवितांचा हा भावनिक दरवळ अशा अनेक सुंदर कवितांनी नटलेला साहित्य रसिकांनी अनुभवावा.हा काव्यसंग्रह अंतरी खूप सुंदर आहे. आणि प्रत्येकाने वाचावा असा आहे. लेखन सुजाता पुरी यांनी केले आहे.

# राज्यात गोतस्करांवर 'मकोका' कायद्यांतर्गत गुन्हे दाखल

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

- महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, पंचायत समिती यांना पालन करण्याचे आदेश

राज्यात गोहत्या बंदी कायदा करण्यात आला आहे. मात्र, तरीही गोतस्करांवर अंकुश लावण्यासाठी आता गोतस्करांवर आता थेट ‘मकोका’ कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्याचे आदेश गृह विभागाने दिले आहेत. तसेच गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करणे तसेच संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच, इतर आनुषंगिक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा / नगर पालिका / नगर पंचायती तसेच, सर्व जिल्हा परिषदा/ पंचायत समिती व ग्राम पंचायत यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत तथा विनापरवाना कत्तलखाने शोधून त्यांच्यावर नियमोचित कारवाई करावी. तसेच, कोणत्याही क्षेत्रात अनधिकृत तथा विनापरवाना कत्तलखाने असणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे सूचविण्यात आले आहेत. प्रचलित असलेले कायदे व नियम यांचा भंग करून वारंवार संघटित पद्धतीने गोतस्करी करणाऱ्या व्यक्ती, टोळ्या अथवा संघटनांविरुद्ध संबंधित पोलीस यंत्रणेने प्रचलित नियमानुसार तपास करून महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत नियमोचित कारवाई करण्यात येणार आहे. राज्यातील परिवहन/वाहतूक विभागाने उपरोक्त प्रमाणे अवैधरीत्या गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करुन संबंधित वाहनांवर मोटार वाहन अधिनियम व इतर आनुषंगिक कायदयांनुसार नियमोचित कारवाई करावी.

# माजी महापौर संदीप कोतकर भाजपच्या वाटेवर

## १ जून अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

विधान परिषदेसाठी भाजपकडून माजी महापौर संदीप कोतकर यांचे नाव पुढे आले आहे. भाजपचे वरिष्ठ नेते व कोतकर यांच्यात बैठक झाल्याची माहिती आहे.

भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाकडून हिरवा कंदील मिळाला, तर कोतकर केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत शनिवारी शिर्डी येथे होणाऱ्या कार्यक्रमात भाजपमध्ये प्रवेश करू शकतात, अशी चर्चा आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. या जागेसाठी

जिल्ह्यातील दिग्गज नेते इच्छुक आहेत. महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतीचे नगरसेवक मतदार आहेत. दिवंगत अरुण जगताप दोनवेळा विधान परिषदेवर निवडून गेले होते. ते जानेवारी २०२२ मध्ये निवृत्त झाले. तेंव्हापासून ही जागा रिक्त होती. चार वर्षानंतर ही निवडणूक होत आहे. या जागेसाठी माजी आमदार प्राजक्त तनपुरे, माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप, माजी महापौर संदीप कोतकर, माजी आमदार चंद्रशेखर घुले यांच्या नावाची चर्चा आहे. यातील माजी महापौर संदीप कोतकर यांचे जोरकसपणे प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्या पत्नी माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर विधानसभेची निवडणूक लढविणार होत्या. पण, ऐनवेळी त्यांनी माघार घेतली. महापालिका निवडणुकीतही ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांनी सुरुवातीला मोर्चेबांधणी केली. त्याही निवडणुकीत कोतकर यांनी माघार घेतली. सलग दोन निवडणुकांतून माघार घेतलेल्या कोतकर यांनी विधान परिषदेसाठी जोरदार तयारी सुरु केली आहे. या निवडणुकीत सर्वाधिक नगरसेवक भाजपकडे आहेत. त्यामुळे विधान परिषदेची आमदारकी हवी असेल त्यांना भाजपात प्रवेश करावा लागेल. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनादेखहव मतदारांची जुळवाजुळवी करणारा



बलवान उमेदवार हवा आहे. कोतकर यांच्याकडे तीच क्षमता आहे. त्यामुळेच भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी कोतकर यांच्याकडे विचारणा केल्याचे बोलले जाते. चर्चेची पहिली फेरी पुण्यात झाल्याची चर्चा आहे. राहूरी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत माजी आमदार तनपुरे यांनी माघार घेतल्याने अक्षय कर्डिले यांचा विजयाचा मार्ग सुकर झाला. तनपुरे यांच्या त्यागाची परतफेड त्यांना विधान परिषदेची उमेदवारी देऊन भाजप करू शकतो, असाही एक सूर आहे. परंतु, तनपुरे यांच्याकडून भाजपला प्रतिसाद मिळताना दिसत नाही.

# गॅस संपला की माणुसकीही संपली?

बिलोली : (स. गांवकरी)

- बिलोली उपजिल्हा रुग्णालयात आठवड्यापासून रुग्ण उपाशी
- आडमुठ कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करण्याची मागणी




बिलोली येथील उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात मागील सात ते आठ दिवसांपासून भरती असलेल्या रुग्णांना डाएट मिळत नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. ‘गॅस संपल्यामुळे जेवण दिले नाही’ असे हास्यास्पद कारण प्रशासनाकडून तसेच आडमुठ कंत्राटदाराकडून पुढे करण्यात आले असल्याचे बिलोली शहरातील सामाजिक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमूर्गे यांनी म्हटले आहेत. जवळपास अंदाजे 50 रुग्ण उपाशी, कर्मचारी-डॉक्टरांना जाब तसेच रुग्णांना विचारले असता या काळात सकाळचा नाश्ता, चहा आणि दुपार-रात्रीचे जेवण मिळालेले नाही असल्याचे माहिती मिळाली. सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मीकांत कलमूर्गे यांनी सवाल केला की, "गोरगरीब रुग्णांना उपाशी ठेवणारे कर्मचारी आणि डॉक्टर्स स्वतः इतके दिवस उपाशी आहेत का? मग तुम्ही उपाशी राहू शकत नसाल तर रुग्णांना उपाशी ठेवण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?" दीड तासात फक्त एकच कर्मचारी हजर कलमूर्गे यांनी 10 ते 11:30 या वेळेत रुग्णालयाची पाहणी केली असता, सकाळी 10:30 वाजता केवळ एकच कर्मचारी हजर होता. इतर कार्यालयीन कर्मचारी गैरहजर होते. डाएट कंत्राटदाराचा नंबर मागितला असता रुग्णालयातील कर्मचारी यांनी नंबर नसल्याचे सांगितले. बिलोलीचे उपजिल्हा रुग्णालय नेहमीच वादाच्या भोवऱ्यात असते. पण यावेळी प्रकरण रुग्णांच्या जीवावर बेतले आहे. प्रशासन आता तरी जागे होणार का, की गॅस संपल्याच्या नावाखाली माणुसकीचा गॅसही कायमचा संपवणार?

## फोन कट

कंत्राटदाराला विचारणा केली असता त्याने आडमुठेपणाने उत्तर दिले. "मी मुंबईला आहे, एक-दीड महिन्यानंतर येतो तेव्हा भेटू" असे सांगून त्याने फोन कट केला. पुरवले जाणारे जेवण अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून त्यामुळे रुग्णांच्या आरोग्यास धोका आहे. अशा आहारामुळे विषबाधा होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. या संपूर्ण प्रकारावर वैद्यकीय अधीक्षक आणि जिल्हा शल्य चिकित्सकांचे लक्ष आहे का, असा सवाल कलमूर्गे यांनी उपस्थित केला आहे. बिलोली उपजिल्हा रुग्णालय नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. अशा अडमुठ्या कंत्राटदारांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे असताना जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी या कंत्राटदाराचे कंत्राट तात्काळ रद्द करून कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याची मागणी केली आहे.

# केळी पाणी देण्यासाठी जनरेटरचा वापर



रावेर : (स. गांवकरी)

जळगाव जिल्ह्यातील रावेर , यावल , मुक्ताई नगर , हि तालुके केळीचे असल्याने , शेतात उभ्या असलेल्या केळी बागा वाचविण्यासाठी आता सर्वत्र जनरटेरचा वापर केला जात आहे. शेतीला आठच तास विजपुरवठा असल्याने , केळी बागांना पाणी टंचाई जाणवत असुन , त्यामुळे केळी बागा सुकु सुकु लागल्या आहेत. त्यावर उपाय म्हणून शेतकऱ्यांनी जनरेटर लावुन जास्तीचे पाणी देण्यासाठी ट्रक्टर द्वावारे डिझेल जनरेटरचा वापर सुरू केला असून केळी वाचविण्या साठी धडपड सुरू आहे . गेल्या दोन महिन्यांपासून तपमान वाढलेलच असल्याने बागांना पाण्याची खुपच गरज निर्माण झाली आहे. त्यातच आता केळीला 2000 रुपया पर्यंत भाव मिळत असल्याने बळीराजाची धावपळ सुरू आहे. त्यासाठी डिझेलची मागणी वाढलेली असल्याने, ते मिळणे कठीण झाले आहे. त्यातच डिझेलचे वाढलेले भाव ते मिळवण्या साठी लांबच लांब लागलेल्या रंगा या मुळे शेतकरी पुर्णपणे वैतागलेला असून , केळी वाचवावी कशी? हा प्रश्न निर्माण झाला आहे . लाखो रुपये खर्च करून उभे केलेले पिक डोळ्यांदेखत जळून खाक होते की काय? अशी भिती निर्माण झाली आहे. सदरच्या तपमानामुळे खोडाची कंबरडे मोडणे व केळी घड सटकणे असे नुकसान होऊ लागले आहे.

# पाणीपट्टी वसुली करा, अन्यथा योजना बंद पडतील

## मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांची ग्रामपंचायतींना तंबी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




जिल्हा परिषदेच्या सभागृहात गुरुवारी ४० प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी पाणीपट्टीच्या वाढत्या थकबाकीवरून चिंता व्यक्त करत सर्व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना तात्काळ वसुली करण्याचे सक्त आदेश दिले. या बैठकीला कार्यकारी अभियंता हितेंद्र चव्हाण, सुधीर आरळकर, विनोद देसाई, आनंद रुपनर, तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उप-अभियंता उपस्थित होते. संयुक्त समितीचे अध्यक्ष, सचिव व गटविकास अधिकारी ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते. जिल्ह्यातील ४० योजनांमध्ये समाविष्ट असलेल्या गावांचे ग्रामपंचायत अधिकारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत गाव निहाय पाणीपट्टी थकबाकी, संपूर्ण योजनेची थकबाकी, ग्रामपंचायत निहाय वसुली, पाणीपुरवठा कर्मचारी संख्या व समितीचे अस्तित्व यावर सविस्तर चर्चा झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांनी स्पष्ट केले की, योजना चालवण्यासाठी देखभाल-दुरुस्ती, वीज देयक, धरणांची पाणी देयके, शुद्धीकरण पावडर, कर्मचारी पगार यांसारख्या खर्चाचा विचार करूनच पाणीपट्टी आकारावी. उत्पन्नच नसेल तर योजना सुरू कशा राहतील असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्यात गटविकास अधिकारी, उप-अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा, उप-अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व समिती सचिव यांची तातडीने बैठक घेण्याच्या सूचना दिल्या. या बैठकीत प्रत्येक योजनेचा आढावा, त्रुटी, व्यवस्थापन व पाणीपट्टी वसुली यावर निर्णय घ्यावा, असे आदेश देण्यात आले.

सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असल्याने सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून पाण्याचे योग्य नियोजन करावे, जेणेकरून नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार नाही, अशा सूचनाही भंडारी यांनी दिल्या. दरम्यान, जिल्ह्यातील ४० प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांपैकी ८ योजना सध्या बंद असल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये राहुरी तालुक्यातील मुसळवाडी, अकोलेतील शिगनवाडी-लव्हाळवाडी व टिटवी, शेवगावमधील शहर टाकळी, संगमनेरमधील तळेगाव दिघे, नेवासा तालुक्यातील घोगरगाव, गळनिंब, सिरजगाव आणि पारनेर तालुक्यातील कान्हूर पठार या योजनांचा समावेश आहे. या गावांतील नागरिकांना सध्या पाण्यासाठी इतर पर्यायांवर अवलंबून राहावे लागत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## श्री गणेश, तुळजाभवानी व कानिफनाथ मूर्तींची प्राणप्रतिष्ठा संपन्न




शिवनेरी (स. गांवकरी) : कानिफनाथ मंदिर दिल्ली पेठ जुन्नर येथे श्री गणेश तुळजाभवानी व कानिफनाथ मूर्तींची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा भव्य कार्यक्रम पारंपारिक पद्धतीनुसार समस्त ग्रामंस्थ कुमशेत, दिल्ली पेठ, जुन्नर, भगत परिवार व मान्यवरांच्या उपस्थिती कार्यक्रम संपन्न झाला . महंत पिर योगी अजयनाथ यांच्या शुभहस्ते कलशारोहण सोहळा संपन्न झाला . श्री गणेश , तुळजाभवानी व कानिफनाथ मूर्तींची स्थापना महंत पिरयोगी अजयनाथजी व सद्गुरु पोपटनाथ महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात आली. पहिला दिवसी कुमशेत दत्त मंदिर पासुन कानिफनाथ मंदिर जुन्नर या ठिकाणापर्यंत मांडव डहाळे पारंपारिक वाद्य वाजत गाजत मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली . यावेळी बहुसंख्य महिलांनी तुळस , कळशी डोक्यावर घेऊन पारंपारिक गाणी म्हणत फुगड्या खेळत कार्यक्रमाचा आनंद घेतला. दुसऱ्या दिवशी गणपती पूजन , पुण्यहवाचन , जलाधिवास व प्रधान देवता अभिषेक , नवग्रह - रुद्र स्थापन , हवन , नैवेद्य व महाआरती करण्यात आली. तिसऱ्या दिवशी शांती सूक्त पठन , प्रांत पूजन, अभिषेक, शांतीक पौष्टिक हवन, तत्व न्यास हवन , न्यास, धान्याधिवस , पूजन नैवेद्य व महाआरती घेण्यात आली. चौथ्या दिवशी प्रांत पूजा , अभिषेक , बलिदान, मुख्य देवता प्राणप्रतिष्ठा , कलश स्थापना , ध्वजारोहण , पुणाहुती , नैवेद्य , महाआरती व भव्य महाप्रसाद आयोजन करण्यात आले . या धार्मिक कार्यक्रमात समस्त ग्रामंस्थ कुमशेत , दिल्ली पेठ, जुन्नर , भगत परिवार , मान्यवर , शासकीय अधिकारी व परिसरातील भाविकांनी बहुसंख्येने उपस्थिती दाखविली.

## 'प्रायॉरिटी पोस्टपेड' सेवा सुरू



पुणे (स. गांवकरी) : गर्दीच्या ठिकाणी व्हिडिओ कॉल, फोटो अपलोड किंवा ई-मेल डाउनलोड करताना ग्राहकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी भारती एअरटेलने 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' या नव्या सेवेचा शुभारंभ केला आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शशवंत शर्मा यांनी ही माहिती दिली. शाश्वत शर्मा म्हणाले, "गर्दीच्या ठिकाणी नेटवर्कचा अनुभव सातत्यपूर्ण राहावा यासाठी आम्ही विशेष प्रयत्न केले आहेत. ग्राहकांना व्हिडिओ कॉल, ई-मेल डाउनलोड किंवा फोटो अपलोड करताना येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आम्ही 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' सेवा सुरू केली आहे." ही सेवा कंपनीच्या 5G नेटवर्कमधील 'स्लायसिंग' या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहे. या तंत्रज्ञानामुळे नेटवर्कमध्ये सुधारणा होऊन पोस्टपेड ग्राहकांना अधिक स्थिर आणि अखंड कनेक्टिव्हिटीचा अनुभव मिळणार आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये वापरल्या जाणाऱ्या या तंत्रज्ञानाचा भारतात वापर सुरू होत असल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला. कंपनीनुसार, 'एअरटेल प्रायॉरिटी पोस्टपेड' सुविधा सर्व पोस्टपेड प्लॅन्ससाठी उपलब्ध करण्यात आली आहे. सध्या पोस्टपेड वापरणाऱ्या ग्राहकांना हा लाभ आपोआप मिळणार आहे. तर प्रीपेड ग्राहकांना एअरटेल ॲप किंवा जवळच्या एअरटेल स्टोअरमार्फत पोस्टपेडमध्ये अपग्रेड करता येणार आहे.

## हंगामा ओटीटीने नवीन ओरिजिनल सिरीज 'लूटेरी दुल्हन' लॉन्च केली




मुंबई (स. गांवकरी) : भारतातील प्रमुख डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटी ने 19 मे 2026 रोजी आपली नवीन ओरिजिनल सिरीज 'लूटेरी दुल्हन' लॉन्च केली आहे. ही मध्य प्रदेशच्या पार्श्वभूमीवर आधारित एक तीक्ष्ण आणि रोमांचक क्राइम ड्रामा सिरीज आहे. या सिरीजमध्ये पूजा ए गोर आणि सांविका या दोन अभिनेत्री प्रमुख भूमिकेत आहेत, तसेच मनमोहन तिवारीही दमदार भूमिकेत आहेत. ही सिरीज एका मोठ्या आणि उच्च-दावाच्या तपासासोबतच दोन अशा महिलांचे प्रभावी चित्रण दाखवते, ज्या अशा जगात आपला मार्ग शोधत आहेत जे कदाचित कधीच त्यांच्या साठी बनलेले नव्हते. 'लूटेरी दुल्हन' ही कथा मध्य प्रदेशात घडणाऱ्या विचित्र गुन्ह्यांच्या मालिकेभोवती फिरते, जिथे काही नवरे लग्नानंतर रातोरात अचानक गायब होणाऱ्या नवरीकडून लुटले जातात. सुरुवातीला लोक याकडे दुर्लक्ष करतात, पण सब-इन्स्पेक्टर संध्या यादव यांना यात एक पॅटर्न दिसतो आणि त्या या प्रकरणाचा शोध घेण्यास सुरुवात करतात. संध्या यादव ही शिस्तबद्ध आणि हुशार पोलीस अधिकारी आहे, जिला स्वतःला सिद्ध करायचे आहे. समाजातील लग्नाबद्दलच्या दबावाचा सामना करत ती या तपासात पूर्णपणे झोकून देते. तपासादरम्यान तिची भेट मायाशी होते. एक अत्यंत हुशार आणि चतुर फसवणूक करणारी महिला, जिने जगण्यासाठी गुन्हेगारीचा मार्ग निवडला आहे. माया एक असे नेटवर्क चालवते जे कायद्यापेक्षा एक पाऊल पुढे राहून पुरुषांना आपला शिकार बनवते. जसे-जसे संध्या मायाच्या जवळ पोहोचते, हा केस अधिक वैयक्तिक बनत जातो आणि त्यामुळे तिच्या मनातील असुरक्षितता, एकाग्रता आणि ती ज्या स्त्रीचा पाठलाग करत आहे तिच्याबद्दलची अधिक खोल समज निर्माण होते. दुसरीकडे, माया देखील कायद्याला चकवत स्वतःचे स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न करत असते. ही कथा दोन महिलांमधील तणावपूर्ण "कॅट-अँड-माऊस" संघर्ष दाखवते. एक कायद्याचे पालन करणारी, तर दुसरी त्या कायद्याला आव्हान देणारी. दोघीही पुरुषप्रधान समाजात आपापल्या पद्धतीने जगण्यासाठी संघर्ष करत असतात. शेवटी प्रश्न असा उरतो — संध्या मायाला पकडू शकेल का, की माया पुन्हा एकदा व्यवस्थेला चकवत स्वतःचे स्वातंत्र्य मिळवेल?

## इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी आकर्षक भाडेपट्टा सुविधा




चेन्नई (स. गांवकरी) : इसुझू मोटर्स इंडियाने इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी नवीन भाडेपट्टा योजना जाहीर केली आहे. व्यवसाय मालक आणि वाहन ताफा चालकांना वाहन मालकीच्या अतिरिक्त जबाबदाऱ्यांशिवाय अधिक सोयीस्कर आणि किफायतशीर पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना सादर करण्यात आली आहे. टिकाऊपणा, विश्वासार्हता आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखल्या जाणाऱ्या इसुझू डी-मॅक्स एस-कॅबसाठी ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. वाहन भाडेपट्टा पद्धतीकडे वाढता कल लक्षात घेऊन ग्राहकांना अधिक सुलभ आणि स्मार्ट पर्याय देण्यावर कंपनीने भर दिला आहे. कंपनीच्या मते, या योजनेमुळे मोठी प्रारंभिक गुंतवणूक टाळता येणार असून वाहनाचे अवमूल्यन आणि पुनर्विक्रीशी संबंधित चिंता कमी होणार आहेत. तसेच रोख प्रवाहाचे नियोजन अधिक सुलभ होऊन आधुनिक आणि विश्वासार्ह वाहन ताफ्याचे व्यवस्थापन सोपे होणार आहे.

# शहराच्या दुरावस्थेबाबत ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना भेटणार

**दादा पाटील सोनवणे**



राहुरी : (स. गांवकरी)

राहुरी शहराच्या रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुर्दशा झाली असून कुलकर्णी हॉस्पीटल ते शुक्लेश्वर चौक या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना रस्त्याने चालणे मुश्कील झाले आहे हा रस्ता व्हावा या साठी राहुरी नगर पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते दादा पाटील सोनवणे यांनी विशेष प्रयत्न करुन स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून या रस्त्यासाठी निधी मंजूर केला होता परंतु स्थानिक काही लोकांनी या कामाला विरोध करुन काम होऊ नये यासाठी पालिका प्रशासनाला पत्र दिले. आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी शहरातील काही रस्त्याच्या कामासाठी विशेष निधी मंजूर केला होता या कामातील काही रस्त्यांची कामे झाली यात शुक्लेश्वर चौक ते कानिफनाथ चौक या रस्त्यांचे काम पूर्ण झाले कुलकर्णी हॉस्पीटल ते शुक्लेश्वर चौक या भागातील व्यापारी,ग्राहक, नागरिक यांच्या मागणीनुसार हा रस्ता व्हावा म्हणून राहुरी नगर पालिकेचे विरोधीपक्षनेते दादा पाटील सोनवणे यांनी आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या कडे विशेष प्रयत्न केले जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी या कामी लक्ष घालून व्यापारी वर्गाच्या दुष्टीने महत्वाचा असणाऱ्या या कामासाठी मोठा निधी मंजूर केला परंतु काही या भागातील काही लोकांनी या रस्त्याचे कामाला विरोध दर्शविला भुमिगत गटारीचे काम आता पूर्ण झाले आहे हा रस्ता होणे गरजेचे आहे आताचं नागरिकांना या रस्त्याने चालणे मुश्कील झाले आहे. पावसाळ्या पूर्वीच हा रस्ता होणे गरजेचे असून विरोधासाठी विरोध न करता हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज आहे राहुरी शहरातील सर्वच अंतर्गत रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली आहे अपूर्ण कामे मार्गी लावण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार डॉ सुजय विखे पाटील, आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांच्या माध्यमातून प्रयत्नशील राहणार असल्याचे दादा पाटील सोनवणे यांनी सांगितले

शहराच्या विकासासाठी भविष्यात महायुती सरकारच्या माध्यमातून जास्तीत जास्त विकास निधी आणून स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी शहराच्या विकासाचे पाहीलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी युवा आमदार अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली शहरातील भाजपाचे आजी माजी नगरसेवक प्रयत्नशील असल्याचे सोनवणे यांनी सांगितले.

राहुरी शहरातील अनेक विकासाची कामे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत चाळीस वर्षे नगर पालिकेची सत्ता ताब्यात असताना सत्ताधारी गटाला नागरिकांच्या आणी व्यापारी वर्गाच्या मुलभूत गरजा सोडविण्यात अपयश आले आहे डिसेंबरमध्ये झालेल्या निवडणुकीत मतदारांनी सताधारी गटाला परत सत्तेत बसवले नवी पेठ मधील गणपती मंदिर ते शनीमंदिरा पर्यंत असलेल्या दुकान गाळ्यात पावसाळ्यात पाणी जाऊन त्यांच्या मालाचे नुकसान गेली अनेक वर्षांपासून होतं आहे तो मार्गी लावणे अत्यंत गरजेचे आहे आगामी काळात महायुती सरकारच्या माध्यमातून पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रयत्नातून शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करणार असून लवकरच शहरातील भाजपा पदाधिकार्यांचे शिष्टमंडळ पालकमंत्र्यांना भेटणार असल्याचे दादा पाटील सोनवणे यांनी सांगितले.

## इंडियन ऑईलकडून इंधनपुरवठा सुरळीत

मुंबई : (स. गांवकरी)

देशातील विविध भागांमध्ये इंधनाच्या मागणीत वाढ होत असतानाही इंडियन ऑईलकडून पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. वाढती मागणी लक्षात घेता कंपनीने वाहतूक व वितरण व्यवस्था अधिक सक्षम करून अखंड सेवा कायम ठेवली आहे. १ मे ते २१ मे २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील डिझेल विक्रीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यात एकूण विक्री २ लाख ६२ हजार २३५ किलोलीटरवर पोहोचली असून मागील वर्षाच्या तुलनेत त्यात २७.९ टक्के वाढ झाली आहे. नांदेडमध्ये सर्वाधिक ७२.४ टक्के वाढ नोंदली गेली असून परभणीमध्ये ५६.४ टक्के, हिंगोली आणि धाराशिवमध्ये प्रत्येकी ५५.१ टक्के वाढ झाली आहे. सांगलीमध्ये ४९.३ टक्के, यवतमाळमध्ये ४२.७ टक्के, बुलढाण्यात ४२.८ टक्के आणि सोलापुरात ४०.१ टक्के वाढ झाली आहे. पुण्यातही डिझेल विक्रीत १४.७ टक्के वाढ झाली आहे. ग्रामीण भागातील मशागत व कापणीची कामे, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडील तुलनेने कमी दर आणि व्यावसायिक ग्राहकांचा वाढता कल यामुळे मागणीत वाढ झाल्याचे सांगण्यात आले आहे. अनेक संस्थात्मक ग्राहकांनीही इंधन पंपांमधून थेट खरेदी सुरू केल्याने अतिरिक्त मागणी निर्माण झाली आहे. देशभरातील साठवण केंद्रे, वितरण केंद्रे, वाहिन्या, घरगुती गॅस भरणी केंद्रे आणि इंधन पंपांच्या माध्यमातून पुरवठा अखंड सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. वाहतूक व्यवस्था आणि निवडक इंधन पंप चोवीस तास सुरू ठेवण्यात आले असून राज्य प्रशासनाशी समन्वय साधून पुरवठा व्यवस्था सक्षम करण्यात आली आहे.

# चनकापुर धरणावर १८ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू

कनाशी : (स. गांवकरी)

- धरणाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर
- पोलीस व पाटबंधारे विभागाच्या दुर्लक्षावर नागरिकांचा संताप

**नागरिकांच्या मागण्या काय?**

1. चनकापुर धरणावर कायमस्वरूपी पोलीस चौकी व सुरक्षा रक्षक नेमावेत.
2. संपूर्ण धरण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.
3. धोकादायक ठिकाणी सूचना फलक व बॅरिकेड्स लावावेत.
4. दारू पिणाऱ्यांवर व सार्वजनिक ठिकाणी धिंगाणा घालणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.
5. सुट्टीच्या दिवशी विशेष पोलीस गस्त वाढवावी.

कळवण तालुक्यातील पर्यटनस्थळ म्हणून नावारूपाला आलेल्या चनकापुर धरणावर १७ मे रोजी घडलेल्या दुर्दैवी घटनेत मानूर येथील १८ वर्षीय युवकाचा बुडून मृत्यू झाला. या घटनेनंतर धरण परिसरातील सुरक्षेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. धरणावर पोलीस गस्त नसणे, दिवसा ढवळ्या दारूच्या पार्ट्या रंगणे व शाळकरी मुलेही धोकादायक ठिकाणी वावरत असणे याकडे पोलीस प्रशासन व पाटबंधारे विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. मात्र ही घटना घडून पाच दिवस उलटले मात्र अध्यापही सुस्त प्रशासन याबाबत कुठलीही ठोस भूमिका घेत नाही त्यामुळे या घटनेनंतर चनकापुर धरणाबाबत उलट-सुलट वितर्कांना उधाण आले आहे. "धरणाच्या पाण्यात भोवरे आहेत", "काम सुरू असलेल्या ठिकाणी धोक्याची सूचना नव्हती" अशा चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहेत. मात्र ृशासनाकडून याबाबत कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही. सध्या पावसाळी पर्यटनामुळे चनकापुर धरणावर दररोज शेकडो पर्यटक येतात. विशेषतः सुट्टीच्या दिवशी तरुणाईची मोठी गर्दी होते. मात्र धरणाच्या सुरक्षेचा पूर्ण बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, "अभोणा पोलीस प्रशासनाकडून धरण परिसरात कोणतीही गस्त घातली जात नाही. त्यामुळे तरुण मुले बिनधास्तपणे धोकादायक ठिकाणी सेल्फी काढतात, पाण्यात उतरतात. दिवसा ढवळ्या धरणाच्या कडेला दारूच्या पार्ट्या रंगतात. रिकाम्या बाटल्या, काचेचे तुकडे सर्वत्र पडलेले असतात. शाळकरी मुले-मुलीही याच ठिकाणी येतात. एखादी दुर्घटना घडण्याची वाट तर प्रशासन पाहत नाही ना?" असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांनी केला. धरणाची मालकी असलेल्या पाटबंधारे विभागानेही सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना केलेली नाही. धरणाच्या मुख्य भिंतीजवळ, सांडव्याजवळ व खोल पाण्याच्या ठिकाणी 'धोक्याची सूचना', 'पाण्यात उतरू नये' असे फलक लावलेले नाहीत. संरक्षक कठडे अनेक ठिकाणी तुटलेले आहेत. काम सुरू असलेल्या ठिकाणीही बॅरिकेड्स लावलेले नव्हते. यामुळेच आशा दुर्घटना वारंवार घडतात , असा आरोप ग्रामस्थ करत आहेत. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. "दरवर्षी उन्हाळ्यात पावसाळ्यात अशा घटना घडतात. पेपरमध्ये बातम्या येतात. दोन दिवस चर्चा होते आणि पुन्हा सगळे शांत. पोलीस प्रशासन आणि पाटबंधारे विभागाला जाग कधी येणार? आणखी किती बळी गेल्यानंतर धरणावर सुरक्षा रक्षक नेमणार? सीसीटीव्ही बसवणार?" असे संतप्त प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

# प्राधिकृत अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी यांनी स्विकारला पदभार

(स. गांवकरी)




नांदेड जिल्हा प्रतिनिधी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज पदभार स्वीकारला.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था शाहुराज हिरे यांच्याकडून त्यांनी पदभार स्विकारल्यानंतर बँकेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. पदभार स्वीकारल्यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. यावेळी विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेत बँकेच्या प्रशासकीय व आर्थिक कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. तसेच मुख्यालयातील विविध विभागांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणीही केली. या प्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजय कदम, वैधानिक परीक्षक रोहित लोहिया तसेच बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची मुदत 3 एप्रिल 2026 रोजी संपुष्टात आल्याने नव्या संचालक मंडळाच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. सध्या अंतिम मतदार यादी तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

संचालक मंडळाची मुदत संपल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील कलम 77-अ (1) (दोन) नुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी विद्यमान संचालक मंडळ निष्प्रभ करून बँकेचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे यासाठी जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांची 27 एप्रिल 2026 रोजी "प्राधिकृत अधिकारी" म्हणून नियुक्ती केली होती. त्यांनी पदभार स्वीकारून बँकेचे प्रशासकीय कामकाज सुरू ठेवले होते.

## एअरटेलने 'प्रायोरिटी पोस्टपेड' सेवा सुरू केली ग्राहकांना उत्कृष्ट नेटवर्क अनुभवाचा लाभ

नवी दिल्ली : (स. गांवकरी)




भारती एअरटेलने आज 'प्रायोरिटी पोस्टपेड' ही नवी सेवा सुरू करण्याची घोषणा केली. ही सेवा 5G स्लायसिंग तंत्रज्ञानाचा वापर करून पोस्टपेड ग्राहकांना उत्कृष्ट आणि सातत्यपूर्ण नेटवर्क अनुभव प्रदान करते. काम, मनोरंजन किंवा ऑनलाइन सहयोगासाठी अखंड कनेक्टिव्हिटीवर अवलंबून असलेल्या व्यस्त ग्राहकांसाठी ही सेवा विशेषतः विकसित करण्यात आली आहे. या सेवेसाठी एअरटेलने आपल्या 5G नेटवर्कमध्ये स्लायसिंग तंत्रज्ञानाच्या प्रगत क्षमतांसह सुधारणा केली आहे. यामुळे नेटवर्क अधिक कार्यक्षम बनते; अधिक क्षमता निर्माण होते; तसेच ही क्षमता विशिष्ट पद्धतीने वापरून प्रायोरिटी ग्राहकांना उत्कृष्ट अनुभव देणे शक्य होते. नेटवर्क क्षमतेचे बुद्धिमत्तापूर्ण आणि गतिशील विभाजन करून, एअरटेल उच्च ट्रॅफिकच्या परिस्थितीतही पोस्टपेड ग्राहकांना स्थिर, विश्वासार्ह आणि सातत्यपूर्ण अनुभव देत आहे. गेल्या वर्षभरात अमेरिका, सिंगापूर, युनायटेड किंगडम आणि मलेशिया यांसारख्या अनेक देशांमध्ये स्लायसिंग-आधारित 5G सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. भारतातील अशा प्रकारची ही एअरटेलची पहिलीच सेवा असून, अधिक स्मार्ट, सक्षम आणि भविष्यकालीन डिजिटल नेटवर्क उभारण्यासाठी एअरटेल करत असलेल्या सातत्यपूर्ण गुंतवणुकीचे हे प्रतीक आहे.

# आपला ठसा उमटवणाऱ्या एस्सेल समूहाची रोमांचक 100 वर्षे पूर्ण

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

बहुआयामी भारतीय व्यावसायिक समूह एस्सेल ग्रुपने गौरवशाली 100 वर्षे पूर्ण करून आपल्या प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. 1926 मध्ये आदमपूर नावाच्या एका छोट्या शहरात झालेल्या सुरुवातीपासून ते विविध व्यवसायांमध्ये विस्तारलेल्या बहुआयामी समूहापर्यंत, एस्सेल ग्रुपने जगभरात एक कायमस्वरूपी ठसा उमटवला आहे.

1967 पासून, एस्सेल ग्रुपने एका पारंपरिक व्यवसायातून स्टार्ट-अपमध्ये स्वतःला रूपांतरित करत जागतिक समूहामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले आणि स्वतःला नव्याने घडवले आहे. ग्रुपच्या मुळातील पारंपरिक वस्तूंच्या व्यापाराचा व्यवसाय लष्करी पुरवठा आणि सीमेपलीकडील व्यापाराकडे वळवण्यात आला. विशेष म्हणजे, अनेक व्यवसायांची सुरुवात ही या ग्रुपने केली असून, उद्योगातील अनेक गोष्टींची सुरुवात ही त्यांच्या नावावर आहे. महत्त्वाचे म्हणजे आपली स्टार्ट-अप मानसिकता जोपासत आणि नफ्यावर बारकाईने लक्ष केंद्रित करत, ज्या व्यवसायांनी अपेक्षित मूल्य-वितरणाची पातळी गाठली नाही, असे काही व्यवसाय बंद करण्यास ग्रुपने कधीही मागेपुढे पाहिले नाही.

स्वर्गीय राम गोपाल जी यांनी स्थापन केलेला, त्यांचे सुपुत्र श्री जगन्नाथ जी गोएंका यांनी विस्तार केलेल्या या व्यवसायाला श्री. नंद किशोर जी यांनी भक्कम पाठिंबा दिला. दूरदृष्टी लाभलेल्या डॉ. सुभाष चंद्र आणि त्यांचे बंधू – लक्ष्मी नारायण, जवाहर आणि अशोक गोयल यांनी यशस्वीपणे नेतृत्व केलेला एस्सेल ग्रुप हा मोजक्याच भारतीय व्यावसायिक समूहांपैकी एक आहे, जो आपली समृद्ध परंपरा सहाव्या पिढीकडे यशस्वीपणे हस्तांतरित करत आहे – आणि विशेष म्हणजे, या समूहाची चौथी आणि पाचवी पिढी आजही सक्रिय आहे.

गेल्या शतकादरम्यान, या समूहाने पॅकेजिंग, गृह मनोरंजन, मनोरंजन उद्याने, वृत्तसेवा, आशय वितरण, पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता, शिक्षण, तंत्रज्ञान, जीवनशैली आणि अशा विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये आपला विस्तार केला; ज्यामुळे 190 हून अधिक देशांमधील अब्जावधी लोकांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडला आहे. केवळ उदारीकरणापूर्वीच्या काळात भारतीय व्यावसायिक क्षेत्राची उभारणी करण्यातच या समूहाने योगदान दिले नाही, तर देशाचे भौतिक सामर्थ्य आणि सॉफ्ट पॉवर म्हणजेच सांस्कृतिक व सामाजिक प्रभाव लक्षणीयरीत्या वाढवून देशाच्या आर्थिक विकासालाही बळकटी दिली आहे. केवळ काही कंपन्याच नव्हे, तर संपूर्ण उद्योगक्षेत्रे उभी करणाऱ्या आपल्या पथदर्शी उपक्रमांच्या माध्यमातून, एस्सेल समूहाने आपल्या शतकातील वाटचालीचा ठसा उमटवला आहे; आणि या प्रक्रियेत त्यांनी देशभरातील 1 कोटींहून अधिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत.

या विशेष प्रसंगी डॉ. सुभाष चंद्र म्हणाले, "एस्सेल ग्रुपचा प्रवास हा चिकाटी, लवचिकता, नावीन्य आणि प्रगतीचा राहिला आहे. व्यावसायिक प्रगती ही समाजासाठी आणि राष्ट्रासाठी मूल्यवर्धक ठरली पाहिजे, या आमच्या विश्वासानेच ग्रुपने व्यवसायाच्या प्रत्येक क्षेत्रात उचललेल्या महत्त्वपूर्ण पावलांना मार्गदर्शन केले आहे. मला आणि माझ्या बंधूंना 100 वर्षांचा हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करताना अत्यंत अभिमान वाटतो. पिढ्यानपिढ्यांची दूरदृष्टी आणि अज्ञात क्षेत्रात पाऊल ठेवण्याच्या धैर्यातूनच हा टप्पा उभारला गेला आहे, ज्यामुळे जवळपास प्रत्येक उद्योगच खऱ्या अर्थाने शतकपूर्तीचा ठसा उमटवतो आहे. आपल्या राष्ट्रासोबतच एस्सेल ग्रुपचा विकास झाला आहे आणि मला हे सांगताना अभिमान वाटतो की, आपण सर्वांनी मिळून आर्थिक मूल्य निर्माण केले आहे आणि राष्ट्रीय प्रगतीला चालना देण्यासाठी सामाजिक परिवर्तन सक्षम केले आहे."

हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करत, डॉ. चंद्रा यांनी आज आयोजित केलेल्या एका विशेष टाऊनहॉलमध्ये एस्सेल ग्रुपच्या जगभरातील 10,000 हून अधिक कर्मचाऱ्यांना संबोधित केले. या अत्यंत अनौपचारिक वातावरणात डॉ. चंद्रा यांनी ग्रुपच्या ऐतिहासिक प्रवासावर प्रकाश टाकला आणि हा समृद्ध वारसा पुढे नेण्यात तसेच व्यवसाय भक्कमरित्या उभारण्यात कर्मचाऱ्यांनी बजावलेल्या मोलाच्या भूमिकेची दखल घेतली. आपल्या भाषणात, डॉ. चंद्रा यांनी ग्रुपने आपल्या उत्पादनांच्या माध्यमातून जगभरात व्यापक सकारात्मक प्रभाव निर्माण करण्यात दिलेल्या योगदानावर प्रकाश टाकला. अनेक दशकांपासून ग्रुपच्या प्रवासाचा भाग असलेल्या कर्मचाऱ्यांनी सांगितलेल्या हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी कथाही त्यांनी सांगितल्या. भारतातील पहिली स्टार्टअप कंपनी म्हणून, एस्सेल ग्रुप भविष्यासाठी नवनवीन शोध लावत आणि धाडसी पावले उचलत असल्याचा पुनरुच्चार डॉ. चंद्रा यांनी केला.